## ::: प्रकरण दुसरे :::

### ××× स्त्री समस्याविषयक आधुनिक मराठी नाटक : प्रेरणा आणि प्रवृत्ती ×××

प्रास्ताविक :-

मराठी नाटकाच्या प्रेरणा ह्या देशकाल परिस्थितीनुसार बदलत गेल्या आहेत. स्वातंत्र्यपूर्वकालीन मराठी नाटकांनी सामाजिक प्रबोधन व पारतंत्र्य निवारण हे विषय हाताळले. सामाजिक व राजकीय क्षेत्रातील ज्वलंत प्रश्न तळमळीने, कौशल्याने मांडणारी नाटके जन्माला आली. काळाची एक गरज म्हणूनच ह्या नाटकांची निर्मिती केली गेली आहे. देशभक्ती व समाजजागृती हे मराठी नाटकांचे प्रेरणास्थान होते. स्वातंत्र्यपूर्वकालीन मराठी नाटकाचे स्वरूप पाहता, ती नाटके संगीतप्रधान आढळतात. स्वातंत्र्यानंतर ही परंपरा म्हणावी इतकी जोरकस राहिली नाही. आज तर संगीतपदाशिवाय नाटक प्रभावीपणे साकार होवू लागले आहे. स्वातंत्र्योत्तर मराठी नाटकांकडे दृष्टिक्षेप टाकता, एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की, सामाजिक आशयाचा आत्मा न हरवता, ते अधिकाधिक कलात्मक होवून रंगभूमीवर अवतरत आहे. प्रगल्भता, प्रयोगशीलता, नवनवीन प्रवृत्ती, तंत्रे यामुळे आजचे नाटक प्रगत अवस्थेतून वाटचाल करीत आहे. सामाजिक आशयाला प्राधान्य देणारी ही नाटके "**समाजाभिमुख**" आहेत. म्हणजे "**समाजाभिमुखता**" हे आजच्या नाटकाचे एक वैशिष्ट्य आहे.

सामाजिक जीवनाचे पडसाद आपणास मराठी नाटकात उमटलेले दिसतात. नाटक हे समाजजीवनाचा आरसा असते. अर्थात संपूर्ण समाजजीवनाचे प्रतिबिंब त्या आरशात उमटणे अशक्य असलेतरी विशिष्ट सामाजिक प्रश्नांचे प्रतिबिंब त्या आरशात निश्चितपणे उमटले जाते. आपणास त्या प्रश्नांच्या अनुषंगाने, मराठी नाटकातील स्त्री विषयक समस्यांचा शोध घ्यावयाचा आहे.

सामाजिक विचार जागृती करण्याच्या प्रेरणेने बरीच मराठी नाटके लिहिली गेली आहेत. किंबहुना लोकजागृती करण्याचे एक लोकप्रिय साधन म्हणूनही मराठी नाटकांचा वापर केला गेला आहे. अर्थात समाजजागृतीसाठी "नाटक" ह्या वाङ्मयप्रकाराचाच वापर का केला याचा बोध चटकन होवू शकतो. कोणत्याही साहित्याची प्रकृती, तिचे प्रयोजन ठरवित असते. नाटक ह्या वाङ्मयप्रकाराची प्रकृती पाहता, लोकजागृतीचे प्रयोजन

नाटककारांनी बाळगणे साहजिकच आहे· कारण नाटक हे एकाचवेळी अनेक लोकांना आकर्षित करते· एकाचवेळी अनेकजण त्याचा आस्वाद घेवू शकतात· प्रयोगाशिवाय "नाटक" ह्या प्रकाराला पूर्णत्व नाही· लिखित नाटकाचे प्रयोगरूप रंगभूमीवर उभे राहिले की, त्या लिखित नाटकाला नाटक म्हटले जाते· समाजाला विचार देण्याचे कार्य नाटक करते· समाजमनावर परिणाम करण्याची क्षमता, इतर वाङ्मयप्रकारापेक्षा नाटकामध्ये अधिक असल्याने, सामाजिक सुधारणांसाठी, समाज जागृतीसाठी, एक व्यापक व प्रभावी साधन म्हणून मराठी नाटकांचा अवलंब होणे साहजिक होते·

मराठी नाटकांचा प्रारंभ पौराणिक नाटकांनी झाला आहे· त्यात तत्कालीन समाजदर्शनाचा अभाव होता· पुराणकथांच्या आकर्षणातून ही नाटके निर्माण झाली· त्यामुळे अशा नाटकात तत्कालीन समाजदर्शन घडणे वा दाखविणे शक्य नव्हते· केवळ मनोरंजनाचा शुध्द हेतू बाळगूनच ही नाटयनिर्मिती झाली· परंतु काळ जसा बदलत गेला, तसा ह्या निव्वळ रंजनवादी पौराणिक नाटकांच्या निर्मितीचा ओघही थंडावला· नाटककारांना मनोरंजनाबरोबर समाज उदबोधनाचीही आवश्यकता वाटू लागली· त्यातूनच ऐतिहासिक व सामाजिक, राजकीय परिस्थितीचे पडसाद मराठी नाटकात उमटलेले दिसतात· समाजापुढील समस्यांचा शोध घेण्यासाठी मराठी नाटकांचा अभ्यास उपयुक्त ठरतो· आपणांस प्रामुख्याने आधुनिक महाराष्ट्रातील समाज जीवन व त्यातील स्त्री समस्यांचे चित्रण करणा-या नाटकांचा विचार करावयाचा आहे· स्त्री समस्या मांडण्याच्या संदर्भात मराठी नाटकांनी केलेली कामगिरी खरोखरच मोलाची आहे· आपण मराठी नाटकांची स्त्री समस्या विषयक भूमिका पाहू या· तसेच या नाटकांनी कोणत्या स्त्री समस्या मांडल्या ,कशारितीने मांडल्या व उपाय कोणते सुचविले यांचाही शोध घेवू या· यासाठी सर्वप्रथम आधुनिक महाराष्ट्रातील समाजजीवन व स्त्री समस्या यांचा मागोवा घेवूया·

### ××× आधुनिक महाराष्ट्राच्या समाजजीवनाचे स्वरूप आणि स्त्री समस्या ×××

व्यक्ती आणि समाज यांचा अतुट संबंध आहे· कोणतीही व्यक्ती ही समाजाचा एक घटक असते· प्रत्येक व्यक्तीला, व्यक्तिगत व सामाजिक जीवन असते· ही व्यक्ती स्वतःच्या विचारांनी जगत असलीतरी, त्या व्यक्तीला सामाजिक संकेत स्वीकारावेच लागतात· हे सामाजिक संकेत जेव्हा तोडले जातात तेव्हा सामाजिक समस्या निर्माण होतात· सामाजिक समस्या का, कधी व कशा निर्माण होतात याचा अभ्यास आपणास करावयाचा नाही

कारण अशा प्रकारचा पध्दतशीर अभ्यास करणे हा समाजशास्त्रातील एक महत्वाचा विभाग आहे· आपणास येथे सामाजिक स्त्री समस्या कशा निर्माण झाल्या व त्या कोणत्या प्रकारे मराठी नाटकांनी मांडल्या याचा विचार करावयाचा आहे·

सामाजिक समस्येची जाणीव कशी होते ? यावर भाष्य करताना डॉ·सुधा काळदाते म्हणतात, "समाजात प्रत्येक घटनेचा परिणाम निरनिराळ्या प्रकारे होत असतो· कोणतीही पूर्वजांनी केलेली व्यवस्था सध्याच्या पिढीला सारखीच आवडते व पटते असे नाही· त्यामुळे प्रत्येक काळातील समाजात आधीच प्रस्थापित केलेल्या व्यवस्थेबद्दल, नियमाबद्दल नाराजी निर्माण होते· कायदे, नीतीनियम आणि बंधने जाचक वाटतात· जोपर्यंत त्यांची जाचकता वाढत नाही तोपर्यंत व्यक्ती त्यानुसार वागतात· परंतु जाचकता वाढली तर त्यानुसार वागण्याचे टाळू लागतात· असहकार्य करतात आणि विद्रोहाची भाषा करू लागतात· अर्थातच अशा व्यक्ती कधीकधी मोठया संख्येने पुढे येतात· तर कधी मूठभर लोकांनाच तसे जाणवल्याचे दिसते· नियम बदलावे, व्यवस्थांमध्ये बदल करावा असे वाटू लागणे म्हणजे समस्यांची जाणीव होणे·"[१] भारतात इंग्रजी अंमल आल्यानंतर समाजव्यवस्थेमध्ये बदल व्हावा असे सुशिक्षितांना वाटू लागले· स्त्री च्या स्वतंत्र अस्तित्वाचा विचार करण्याची प्रक्रिया सुरू झाली· स्त्री संदर्भात जुन्या व्यवस्थेनुसार वर्तन करता येणार नाही याची जाणीव समाजातील बहुसंख्य लोकांना होवू लागली· चालत आलेली, तसेच काही बाबतीत आहे ही परिस्थिती बदलली पाहिजे असा विचार "स्त्री" बाबतीत होवू लागला आहे·

स्वातंत्र्यपूर्वकाळात, स्त्रीशिक्षणाची समस्या मोठी होतीच याशिवाय बालविवाह, जरठकुमारी विवाह, विधवांचा छळ, केशवपन, विधवा विवाह, हुंडा असे अनेक स्त्री विषयक प्रश्न होते· रूढी, परंपरा, अंधश्रध्दा यातून अशा प्रकारच्या समस्या निर्माण होतात· मराठी नाटकांनी ह्या स्त्री समस्या मांडल्या आहेत· स्त्री समस्यांचे स्वरूप काळानुसार बदलत गेलेले दिसते· बालविवाह, जरठकुमारी विवाह यासारख्या काही समस्या कालबाहय झाल्या असल्या तरी अजून काही समस्या आजही अस्तित्वात आहेत· "हुंडा" ही भयानक स्त्री समस्या आहेच· ती मानवतेला कलंक लावणारी बाब आहे· हुंडयाच्या लालसेपोटी अनेक स्त्रियांचे जीवन उध्वस्त होते आहे· स्त्रीला गुलाम म्हणून वापरण्याची प्रवृत्ती दिसते· आज स्त्री शिकू लागली· स्वतःच्या पायावर उभी राहू लागली, स्वतंत्र विचार करू लागली आहे· स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्री शिक्षणासाठी

समाजसुधारकांनी जी कामगिरी केली, त्याचे फलित म्हणजे आजची प्रगत स्त्री आहे.

इंग्रजी सत्तेनंतर पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव समाजमनावर पडू लागला. व्यक्तिस्वातंत्र्याचा विचार होवू लागला. पाश्चात्य शिक्षणाच्या प्रसाराबरोबर स्वातंत्र्य, समता, बंधुता, व सामाजिक न्याय यावर आधारित नव्या समाजाची उभारणी झाली पाहिजे; ह्या उभारणीत स्त्रीला योग्य स्थान प्राप्त झाले पाहिजे; स्त्री शिक्षणाला चालना दिली पाहिजे असे विचार जोमाने पुढे आले. महात्मा फुले यांनी १८४८ ला मुलींसाठी पहिली शाळा पुण्यात सुरू केली. सावित्रीबाईनी साथ केली. समाजसुधारकांनी आपले लक्ष ह्या दुलर्क्षित स्त्री जीवनाकडे वळविले आणि मग उपेक्षित असे अंधारमय जीवन जगणारी स्त्री प्रकाशाच्या वाटेवर येवू लागली. तिच्या भोवतीचा अंधार दूर होऊ लागला. स्त्रीच्या स्वतंत्र अस्तित्वाचा विचार साहित्यात होवू लागला.

महाराष्ट्रीय स्त्रीच्या जीवनातील विविध शल्ये, रूढी-परंपरामुळे तिच्या जीवनाची झालेली परवड, तिच्या जीवनात आलेली अगतिकता समाजाच्या नजरेसमोर आणण्याचे कार्य साहित्यिकांनी केले. लोकहितवादी, महात्मा फुले, न्या. रानडे, विष्णुशास्त्री चिपळुणकर, आगरकर, महर्षी कर्वे हे मराठी वाङ्मयातील स्त्री जीवनाचे प्रभावी भाष्यकार आहेत. त्यांच्या कृतिशील विचारसरणीने "स्त्री"च्या जीवनाला एक दिशा मिळाली. ताराबाई शिंदे यांनी "स्त्री-पुरुष तुलना" या निबंधात स्त्री समस्यांचा मार्मिक वेध घेतला आहे. सुरतेला १९ वर्ष वयाच्या विजयालक्ष्मी नावाच्या विधवा स्त्रीने भ्रूणहत्या केली. सेशन कोर्टाने तिला फाशीची शिक्षा दिली. तेव्हा तिने हायकोर्टात अपील केले. तेथे तिला जन्मठेपीची शिक्षा झाली. यावर महाराष्ट्रात मोठा वादंग माजला. पुण्याच्या सार्वजनिक सभेने व इतर लोकांनीही मुंबई सरकारला गुन्हयाची माफी मिळावी म्हणून अर्ज केले. त्यावरून विजयालक्ष्मीला जन्मठेपी ऐवजी पाच वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा झाली. या खटल्याच्या निमित्ताने ताराबाई शिंदे यांनी निबंधाच्या रूपाने आपले "स्त्री-पुरुष विषयक" विचार व्यक्त केले. पारंपरिक स्त्रियांच्या समस्याबरोबर त्यांनी विधवा पुनर्विवाहाची समस्या आपल्या निबंधात मांडली आहे. स्त्रियातील अज्ञान, अंधश्रध्दा यांचाही त्यांनी परामर्श घेतला आहे. बालजरठ विवाहास विरोध व एकपत्नी व्रताचा आग्रह त्या व्यक्त करतात. पुरुष वर्गाकडून स्त्री वर्गावर जी बंधने घातली गेली व तिच्या प्रतिष्ठेचा विचार केला नाही, या प्रवृत्तीवर त्या प्रहार करतात. शंभर वर्षापूर्वी ताराबाई शिंदे यांनी घेतलेली ही भूमिका निश्चितच क्रांतिकारी होती. त्यांच्या निबंधावर भाष्य करताना

डॉ· शारदा म· देशपांडे म्हणतात, "स्त्री मुक्ती आंदोलनाचे आजचे स्वरूप प्रतिकारात्मक व प्रतिक्रियात्मक आहे· पण एकशेदहा वर्षापूर्वी पुरुष वर्गाचे सर्वंकष अन्याय वर्चस्व, त्या वर्चस्वाची प्रदीर्घ परंपरा या गोष्टी पुरुषांच्या व स्त्रियांच्या देखील लक्षात आणून द्यावयाच्या होत्या· पुरुषाला अंतर्मुख करावयाचे होते· आत्मपरीक्षण उद्योक्त करावयाचे होते· केवळ या गोष्टीला शंभरपेक्षा अधिक वर्षे लागली हे आज आपण पाहात आहोत· या प्रयत्नाचा पहिला उद्‌गार म्हणजे ताराबाई शिंदे यांचा "स्त्री पुरुष तुलना" हा निबंध । स्त्रीचे स्वतंत्र अस्तित्व सहानुभूतीपूर्ण मनाने सिध्द करण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे·" ३

ताराबाई शिंदे यांनी स्त्री समस्येचा विचार करताना पुरुषांच्या मानसिकतेचा विचार केलेला आहे· पुरुषातला माणूस जागा करावा हा त्यांच्या निबंधाचा हेतू दिसतो·

स्त्री विषयक मानवतावादी दृष्टिकोन स्वीकारून समाज परिवर्तन करण्यासाठी समाजसुधारकांनी लढा दिला· यामध्ये, सती सारखी मानव्याच्या व व्यक्तिस्वातंत्र्याच्या दृष्टीने घृणास्पद असलेली चाल बंद करण्यासाठी राजाराम मोहन रॉय यांनी पुढाकार घेतला· त्यांच्या प्रयत्नांना यश आले· इ·स· १८२९ ला सतीबंदीचा कायदा झाला· तेथूनच स्त्रीच्या आधुनिक काळातील जागृत वाटचालीला सुरुवात झाली· स्त्री दुःखांना वाचा फोडली जावू लागली· त्यानंतर इ·स· १८५६ साली पुनर्विवाहाचा कायदा झाला· व्यंकटेश माडगूळकरांचे "सती" आणि जयवंत दळवी यांचे "बॅरिस्टर" ही नाटके स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लिहिली गेली असलीतरी त्यांच्या नाटकातील स्त्री समस्या ह्या स्वातंत्र्यपूर्व काळातील आहेत· या नाटकात जागृत व विचारी स्त्रीचे दर्शन घडते·

ब्रिटीश काळातच सती जाण्यास मज्जाव करणारा, त्यानंतर विधवांच्या पुनर्विवाहास मान्यता देणारा कायदा, बालविवाहास प्रतिबंध करणारा (शारदा कायदा), आंतरजातीय विवाहास मान्यता देणारा कायदा, स्त्रीच्या मिळकतीच्या हक्काचा कायदा संमत होवून स्त्रीच्या अस्तित्वाचा व भवितव्याचा विचार होवू लागला· सामाजिक दृष्टीने पाहिले तर, आजच्या स्त्रीचे स्थान प्रगत आहे· जुन्या बुरसटलेल्या विचारापासून ती मुक्त होत आहे, याचा अर्थ ती समस्यामुक्त आहे, असा नव्हे, तर तिला आजही कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागतच आहे· देवल, गडकरी, कोल्हटकर, वरेरकर, अत्रे, रांगणेकर, मुक्ताबाई दिक्षीत, मालतीबाई बेडेकर इ·साहित्यिकांनी मराठी स्त्रीच्या समस्या आपल्या नाटकातून मांडल्या आहेत·

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय राज्यघटनेने स्त्रीला समान नागरिकत्वाचे हक्क दिले. स्त्रीला कौटुंबिक, सामाजिक समानता प्राप्त व्हावी या दृष्टीने काही पावले उचलली गेली. व्दिभार्या प्रतिबंधक कायदा पसार करून स्त्रीला कौटुंबिक न्याय दिला गेला. सामाजिक क्षेत्रातही स्त्रीला स्वातंत्र्य मिळू लागले. सामाजिक संतुलन राखण्यासाठी ही स्त्री-पुरुष समान भूमिका आवश्यकच आहे. यासंदर्भात डॉ.आ.ह.साळुंखे म्हणतात, "स्त्री ला स्वातंत्र्य देण्यामुळे समाजाचे संतुलन बिघडेल किंवा स्थैर्य नाहिसे होईल, अशी भिती बाळगण्याचे कोणतेही कारण नाही, उलट आज समाजाचे एक अंग लुळे पडल्यासारखे असल्यामुळे समाजामध्ये संतुलन नाही, समतोल नाही. स्त्री स्वातंत्र्याचा अर्थ हे गेलेले संतुलन नव्याने प्रस्थापित करणे, एवढाच आहे. लंबक आज एका टोकाला आहे. तो उद्या दुस-या टोकाला नेणे, अशी अतिरेकी कल्पना येथे अभिप्रेत नाही. तोल कोणत्याही बाजूने गेला, तरी समाजाची हानीच होणार आहे. म्हणूनच समतोलाचे वा संतुलनाचे महत्व ओळखले पाहिजे. अर्थात, हातात तराजू घेवून सोने जोखल्याप्रमाणे अगदी काटेकोर व आदर्श असे संतुलन निर्माण करता येईल असे नव्हे. जिवंत समाजाच्या बाबतीत इतका बंदिस्तपणा, इतकी नियमबध्दता अशक्य आहे. तरीदेखील जेथे जेथे तोल ढळल्याचे ध्यानात येते, तेथे तेथे तो सावरण्याचा प्रयत्न करणे आवश्यकच आहे."[३]

"स्त्रियांची सर्जनशीलता केवळ अपत्यापुरती मर्यादित न ठेवता जीवनाच्या विविध क्षेत्रात तिला कर्तृत्वाची उंच उंच शिखरे गाठण्याची संधी देणे, हे एकूण मानवजातीच्या दृष्टीने अत्यंत हिताचे आहे"[४] असेही प्रतिपादन डॉ.साळुंखे करतात.

स्त्रीच्या कौटुंबिक, शिक्षणविषयक, विवाह विषयक हक्काबरोबरच तिच्या सामाजिक व राजकीय हक्कांची, तिच्या कार्यकक्षांची चर्चा सुरू झाली. महाराष्ट्रात समाजवादी विचार वाढीला लागले. याचा फायदा असा झाला की, जीवनाच्या आर्थिक, सामाजिक, नैतिक क्षेत्रातील रूढ विचारांचे, संकेताचे, कल्पनांचे एक पुनर्मूल्यांकन सुरू झाले. स्त्री विषयी अनुकुल वातावरण व तशी विचारसरणी निर्माण होवू लागली. स्वातंत्र्यपूर्वकाळातील प्रतिकूल विचार दूर होवू लागले. स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्रीशिक्षणाविषयी प्रतिकूल असणा-या समाजाचे मत नोंदवताना, दु.का.संत म्हणतात, "बहुसंख्यांकाचे मत स्त्री-शिक्षणाविषयी अतिशय प्रतिकूल होते. शिक्षणाने स्त्रिया बिघडतात. त्यांच्यामधील स्नेह, शालीनतावादी गुण कोसळून जातात. व्यक्तिस्वातंत्र्याच्या जाणीवेने त्यांच्यात वेगळ्याच व्यक्तिगत आकांक्षा निर्माण होतात व पर्यायाने हा वर्ग समाजाला पारखा होतो.

अशा प्रकारचे मत अगदी दुस-या महायुध्दाच्या काळापर्यंत जवळ जवळ रूढ होते." [५]

स्त्री शिक्षणात स्वातंत्र्यपूर्वकाळात किती विरोध होता, याचे चित्रण राम शेवाळकर यांनी "आनंदी गोपाळ" या नाटकात केले आहे. स्त्रीशिक्षणाच्या दृष्टीने प्रतिकूल वातावरण असतानाही, केवळ पतीच्या जिद्दीमुळे व स्वतःच्या इच्छाशक्तीमुळे, प्रज्ञेच्या जोरावर, सौ.आनंदी जोशी ह्या अमेरिकेला जावून वैद्यकीय परीक्षा उत्तीर्ण होवून भारतात आल्या, ही घटनाच मुळी क्रांतिकारक म्हटली पाहिजे. स्त्रीला परंपराप्रिय समाजाशी लढा देवूनच शिक्षण पदरात पाडून घ्यावे लागत होते. त्यादृष्टीने सावित्रीबाई फुले यांचे योगदानही समस्त स्त्री समाजाला नव्हे तर अखिल मानव जातीला अभिमानास्पद ठरावे असे आहे.

आजच्या सामाजिक परिस्थितीत स्त्रीला शिक्षणाचा मार्ग सुलभ झाला आहे. परक्याचे धन या नावाखाली तिला स्त्री शिक्षणापासून वंचित व्हावे लागायचे. परंतु आज "शिक्षण" हा एक आवश्यक भाग मानला जावून, स्त्रीला तशा संधी-सवलती उपलब्ध करून दिल्या जावू लागल्या आहेत. विविध क्षेत्रात स्त्रीचा सहभाग होवू लागला आहे. स्त्री सुशिक्षित झाली. अर्थार्जनाच्या निमित्ताने ती घराबाहेर पडून नोकरी करू लागली. कुटुंबाला हातभार लावू लागली. समाजामध्ये आपले स्थान निर्माण करणा-या कमवत्या स्त्रियांच्या-बाबतीत, पारंपरिक समाजव्यवस्थेमुळे काही समस्या उद्भवल्या. या संदर्भात गीता साने यांनी "स्त्री जीवनातील समस्या" लेखात नोकरी करणा-या स्त्रीची दुःखे मांडली आहेत. "उंबरठा ओलांडून शिक्षणाच्या व नंतर नोकरीच्या निमित्ताने बाहेर पडलेल्या स्त्रीने सरमिसळ समाजात कसे वागावे व समाजाने तिला कसे वागवावे ह्याचे रूढसंकेत तिला उपलब्ध नाहीत. मोकळेपणाने वागणा-या स्त्रीबद्दल शंका घेतल्या जातात. मोकळे न वागावे तर इतरांच्या सहकार्याविना जबाबदारी नीट पार पाडणे अशक्य होते. संपर्कातल्या अधिका-यांच्या बाबतीत तक्रारी येतात. त्यातून स्त्रीची बेअब्रू होते, तिच्या कुटुंबाची प्रतिक्रिया ही अनिश्चित असते. कधी नवरा संशयग्रस्त होतो तर कधी तिने बढतीसाठी अधिका-याला प्रोत्साहन द्यावे म्हणून तिच्यावर वजन आणले जाते. एकूण स्त्रीला कामापासून सुखसंतोष न मिळता ती सदैव संत्रस्त व भयग्रस्त मात्र असते." [६]

भारतीय राज्यघटनेने स्त्रीला समान नागरिकत्वाचे हक्क, समान संधी दिली असलीतरी समाजव्यवस्थेमुळे काही समस्या ह्या निर्माण होतात. पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये स्त्रीच्या स्वतंत्र अस्तित्वाचा अजून म्हणावा इतका निकोपपणे विचार होत नाही. एका बाजूला,

स्त्री प्रगतीच्या वाटेवरून चालत असलीतरी तिची वाट रोखून धरणारे काही प्रतिगामी विचारसरणीचे लोक समाजात आढळतातच. ह्या प्रतिगामी विचारसरणीतूनही काही समस्या निर्माण होतात. "स्त्री पुरुष असमानता" ही नैसर्गिक आहे. अशी भूमिका घेवून काही मराठी नाटकातून स्त्रीच्या दुय्यम स्थानाचा पुरस्कार केला आहे. स्त्रीला मांगल्याची, देवीची मूर्ती करून तिला पारंपरिक विचारात बांधून ठेवण्याची भूमिका दिसते. स्त्रीच्या मांगल्याची, तिच्या त्यागाची, सहनशक्तीची जरूर कदर केली पाहिजे. परंतु तिला पारंपरिक विचारात बांधून, त्याचे समर्थन करणे सामाजिकदृष्टया हितकारक नाही. शारीरिक बळाबाबतीत स्त्री-पुरूषाची असमानता एकवेळ मान्य होईल परंतु पुरूषाच्या व्यक्तिगत स्वार्थासाठी तिला उंबरठयाच्या आत ठेवून कुटुंबाचे संगोपन हेच तिचे महत्वाचे व एकमेव कार्य आहे, असे मानणे बरोबर नाही. तिच्या बौध्दिक, कलात्मक कर्तृत्वाचा समान पातळीवर विचार केला गेला पाहिजे व तशी हक्काची संधी तिला उपलब्ध झाली पाहिजे. "सर्वस्पर्शी समतेचा पुरस्कार करणा-या सामाजिक क्रांतिशिवाय खरीखुरी नवी स्त्री निर्माण होणे शक्य नाही"[७] हा वि.स.खांडेकर यांचा विचार सार्थच ठरतो. पारंपरिक विचार, रूढीमुळे स्त्री ही समाजात दलितच राहते. सामाजिक क्रांती शिवाय समाज परिवर्तन होणार नाही. हे सत्य साहित्यिकांनी ओळखले होते. स्त्री आणि दलित यांच्यावर केल्या जाणा-या अन्याया संदर्भात वि.स.खांडेकर म्हणतात, " स्त्रीचे दास्य आणि दलितांचे दास्य दोन्ही दास्ये शतकानुशतके चालत आलेली, धर्माने गौरवलेली, रूढीने अंगवळणी पडलेली, समाजाने पवित्र मानलेली, किरकिरणा-या लहानमुलाला अफूची बाळगोळी देणा-या अडाणी आईप्रमाणे समाजाने या असंख्य दुर्दैवी दासदासींना धर्मावरील अंधश्रध्देच्या साहाय्याने आजपर्यंत स्वस्थ बसविले. पण ही सामाजिक शांतता म्हणजे स्मशानातली शांतता होती । "मला पणाला लावण्याचा धर्मराजाला अधिकार नाही", असे भीष्म-द्रोणांना तळतळून सांगणारी द्रौपदी, शूद्राला तप करण्याचा अधिकार नाही म्हणून प्रभू रामचंद्राकडून मुकाटयाने शिरच्छेद करून घेणारा शम्बूक-स्त्री आणि दलित यांच्यावरच्या धर्माच्या ह्या अमानुष जुलमाची ही प्राचीन परंपरा समूळ नाहिशी करणे हेच आपल्या आजच्या सामाजिक क्रांतीचे मुख्य ध्येय असले पाहिजे."[८]

समाजसुधारकांनी, मराठी नाटककारांनी स्त्री समस्या निवारण करण्यासाठी मोलाची कामगिरी केली. त्यातूनच शारदा कायदा पास झाला. स्त्री पुरुष हे समाजाचे समान घटक आहेत हा कायदा पास झाला. परंतु तो समानतेचा कायदा मनोमन स्वीकारण्याची

समाजाची मानसिक तयारी व्हावी लागते· हे मानसिक परिवर्तन एकदम होणार नाही· असे परिवर्तन व्हायला वेळ लागतो· काही काळ जावा लागतो· तेव्हा समाजाची विचारधारा परिवर्तनशील बनते· आज सामाजिक-राजकीय क्षेत्रात महिलांचा सक्रीय सहभागाचा विचार होतो आहे· हा परिवर्तनाचाच एक भाग आहे· जे अधिकार पुरुषाला तेच स्त्रीला असावेत, स्त्री म्हणून कोणतीही संधी तिला डावलली जावू नये· समाजात स्त्रीला केवळ सहानुभूतीच्या आधारावर नव्हेतर मानाने व हक्काने जगता यावे म्हणून स्त्री संघटना जागरूक व क्रियाशील आहेत· स्वातंत्र्यपूर्वकाळात स्त्रीभूषण, स्त्रीशिक्षण-चंद्रिका, स्वदेश भगिनी यासारखी नियतकालिके स्त्रियांचे प्रश्न मांडत होती· "स्त्री" सारख्या अग्रेसर व पुरोगामी विचाराच्या मासिकांनी स्त्रियांच्या संदर्भात प्रागतिक व व्यापक भूमिका बजावली आहे· स्त्रियांचे सामाजिक स्थान उंचावण्याचे प्रयत्न होत आहेत·

सामाजिक जडणघडणीत स्त्रियांचा वाटा मोठा आहे· मराठी नाटकातून घडणारे स्त्रियांचे दर्शन बहुतांशी पारंपरिक स्वरूपाचे आहे· स्वतंत्र विचाराने वागणारी स्त्री मोठया प्रमाणात दिसत नाही· स्त्रीच्या स्वतंत्र अस्तित्वाचा विचार करणारी, नव्या विचाराने पुढे पाऊल टाकणा-या स्त्रियांचे दर्शन घडविणारी काही नाटके रंगभूमीवर आली· स्त्री समस्येचा गांभीर्याने विचार करून, त्यावर उपाय सुचविणारी नाटकेही जन्माला आली· अशा नाटकांनी सामाजिक जाणीव निर्माण करण्याचे महत्वाचे कार्य केले·

सामाजिक परिस्थितीचे प्रतिबिंब तर नाटकात पडतेच· परंतु याशिवाय स्त्री जीवन विषयक समस्यांचे प्रतिबिंब मराठी नाटकात कसे पडले आहे याचा आढावा आपण घेवूया· तद्नंतर तेंडुलकरांच्या स्त्रीसमस्याविषयक निवडक नाटकांचा मागोवा घेवून त्या नाटकांचे वेगळेपण मांडण्याचा विचार आहे·

## ××× स्त्री समस्याविषयक मराठी नाटके ×××

आपणास येथे प्रामुख्याने आधुनिक महाराष्ट्रातील समाज जीवनाचा व त्यातील स्त्री समस्या विषयक नाटकांचा विचार करावयाचा आहे· परंतु त्यापूर्वी स्वातंत्र्यपूर्वकाळातील सामाजिक परिस्थितीचा व स्त्री समस्यांचा विचार करणे आवश्यक आहे· मराठी नाटकांनी या संदर्भात स्वीकारलेली भूमिका पाहिली पाहिजे· सामाजिक स्त्री समस्येबरोबरच त्या समस्या सोडविण्यासाठी कोणते उपाय किंवा कोणते पर्याय मराठी नाटकांनी सुचविले

आहेत हे पाहणेही संयुक्तिक ठरेल· डॉ·विमल पाटील आपल्या "मराठी नाटक आणि स्त्रियांचे प्रश्न" या लेखात म्हणतात, "स्त्रीशिक्षण, बालविवाह, जरठकुमारी विवाह, विधवांचा छळ, केशवपन, विधवाविवाह, परित्यक्तांची दुःखे, हुंडा असे अनेकविध स्त्रीविषयक प्रश्न मराठी नाटकांनी मांडले· स्त्रियांच्या शारीरिक व मानसिक शोषणाचे दर्शन घडवून, त्यास कारणीभूत ठरणा-या या प्रश्नांच्या निवारणासाठी समाजमनाला आवाहन केले··· मराठी नाटककारांनी सामाजिक प्रश्नासंबंधी आपली मते व विचार कधी प्रकटपणे तर कधी अप्रकटपणे नाटकाच्या माध्यमातून मांडायला सुरुवात केली· मराठी नाटककारांच्या समाजाभिमुख वृत्तीच्या पहिल्या खुणा मराठी नाटयसृष्टी निर्माण झाल्यानंतर पहिल्या दशकात दिसू लागल्या· "विचारसार" नाटक हे देशस्थितीवर लिहिलेले पहिले नाटक आहे· गोविंद नारायण माडगावकर यांनी विघातक चाली सोडण्याचा उपदेश "व्यवहारोपयोगी" नाटकातून केला· विनायक जनार्दन कीर्तने सारख्या नाटककाराने थोरले "माधवराव पेशवे" या सारख्या ऐतिहासिक विषयाच्या आश्रयाने पुर्वजाभिमान जागृत करण्याचा प्रयत्न केला· त्यांनीच "जयपालव्दारे" मूळ विषयांच्या अनुषंगाने तरुणी वृध्द विवाहाची अनिष्टता प्रतिपादन करून प्रीतिविवाहास अनुमती दर्शविली·"[९]

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी नाटकात उमटत गेलेले स्त्री जीवन अभ्यासले असता. तत्कालीन समाजातील स्त्री समस्यांचा परिचय होत जातो· बदलत्या काळाबरोबर काही स्त्री समस्या कालबाह्य झाल्या, तर काही नव्याने निर्माण झाल्या· जसे वि·स·खांडेकर म्हणतात,"हरिभाऊंचा काळ मागे पडला असला, तरी मध्यम वर्गाच्या स्त्री जीवनांतले दुःख अजून तसेच राहिले आहे· दुःख बहुरूपी असते हेच खरे ! ते वेष बदलते, पण आपल्या सावजाची पाठ सोडीत नाही."[१०] काही स्त्री समस्या काळाबरोबर चालत येतात, आक्राळविक्राळ रूप धारण करून समाजजीवन विस्कळीत करत असतात· हुंडयासारखी समस्या आजही समाजमनाला भेडसावताना दिसते·

मराठी नाटकांनी बालविवाह,जरठकुमारी विवाह यांचा निषेध व विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार केला· हुंडयासारख्या अनिष्ट प्रथेला प्रखर विरोध करणारी नाटके लिहिली गेली व आजही लिहिली जात आहेत· हुंडा हा पुष्कळदा प्रतिष्ठेचे प्रतीक मानला जातो· वरदक्षिणेच्या नावाखाली आज भरमसाठ हुंडा या ना त्या रूपात घेतला जातो· हुंडयाच्या लालसेमुळे निरपराध स्त्रीच्या वाटयाला भयानक दुःख येते· हुंडाबळीच्या अनेक घटना आपण वृत्तपत्रातून वाचतो· ही प्रथा बंद होण्यासाठी विविध संघटना कार्यरत आहेत·

मराठी नाटकांनीही हा समाज विघातक चालीविरूध्द महत्वाची भूमिका बजावली आहे. डॉ.सौ.कल्पना परांजपे म्हणतात, "मुलींनी स्वतःच्या पसंतीने लग्न करण्याचा हक्क घेतला की, आपोआप हुंडा घेणा-या मुलांची किंमत उतरेल. कदाचित त्यांच्यावर अविवाहित राहण्याची पाळी येईल. पण आज त्यांना वाटेल तो हुंडा मिळू शकतो. याचे कारण म्हणजे आमच्या मुलींची अशा वरांचा धिक्कार करण्याची अद्याप तयारी नाही. जेथे हुंडा घेतला जात आहे अशा वरमंडपावर मोर्चे आणून हुंडा घेणा-या वराचा धिक्कार करण्याचे धैर्य स्त्री संघटना दाखवित आहेत. हुंडाबळी झालेल्या तरूणींच्या हकीकती त्या उजेडात आणीत आहेत व हुंडाबंदीचा कायदाही आता पास झालेला आहे. पण अद्यापिही समाजात चाललेला हा हुंडयाचा हैदोस कमी झालेला नाही हे आपण पाहतो. हुंडापध्दतीमुळे कित्येक मुलींची आयुष्ये हीच एक समस्या होत असल्यामुळे या प्रथेत बदल व्हावा असे अनेकांना विशेषतः स्त्रीवर्गाला उत्कटतेने वाटत आहे. साहजिकच या सर्व विचारधारांचे प्रतिबिंब वेळोवेळी लिहिल्या गेलेल्या नाटकातून पडत होते." ११

बालविवाह, जरठकुमारी विवाह, केशवपन या अनिष्ट स्त्री समस्येबरोबरच हुंडयाची समस्या नष्ट झाली असती तर स्त्री जीवन उज्वल व सुखकर झाले असते. परंतु जर तर च्या विश्वात रमण्यापेक्षा वर्तमानातील वास्तवतेचा विचार करणे गरजेचे आहे. हुंडयापायी कित्येक निष्पाप स्त्रियांची आयुष्ये मातीमोल होत आहेत. १९६१ ला हुंडाबंदीचा कायदा होवूनही हुंडयाच्या प्रथेचे उच्चाटन होवू शकले नाही, ही वस्तुस्थिती आहे.

हुंडयापूर्वी स्त्रीला द्यावी लागणारी वधूपरीक्षा ही सुध्दा एक स्त्रीसमस्याच आहे. वधूपरीक्षा आणि हुंडा या समस्यांनी स्त्रीला वेढले आहे. वधूपरीक्षा व हुंडा यामुळे नाकारल्या गेलेल्या स्त्रीमनाची व्यथा मराठी नाटकांनी चित्रीत केलेली आहे. समाजातील पारंपरिक विचारसरणीचे दर्शन मराठी नाटकातून कसे घडते ते आपण पाहूया..

**xxx प्रथम हुंडयाची समस्या चित्रित करणा-या मराठी नाटकांचा आढावा घेवूया. xxx**

विवाह हा पवित्र धार्मिक संस्कार असला तरी त्याला व्यावहारिक सौदयाचे स्वरूप आहे. वधू पसंत करणे व लग्नाचा आर्थिक व्यवहार ठरविणे या बाबी विवाह कार्यात महत्वाच्या मानल्या गेल्या. त्यात वरपित्याची भूमिका वरचढ. आपल्या प्रतिष्ठेनुसार हुंडयाची रक्कम ठरविली जाते. भरमसाठ हुंडयापायी लग्न मोडली जातात.. हुंडयाची रक्कम वधूपित्याला मान्य असेल तर वधूपसंती होवू लागली. लग्नातील देण्याघेण्याच्या "याद्या"होवू लागल्या. हुंडयाच्या समस्येने स्त्रीजीवन अंधःकारमय झाले. नारायण हरी भागवत

यांनी हुंडयाचे दुष्परिणाम दाखविणारे "हुंडाप्रहसन" ( १८८५ ) नाटक लिहून या समस्येवर प्रकाश टाकला. रावसाहेबासारख्या लोभी व ढोंगी सुधारकाची फजिती कशी झाली याचे वर्णन केले. पैशापायी आपल्या पोटची पोरं संन्याशाला देवू पाहणारे रावसाहेब, विवाह म्हणजे मुला-मुलींच्या विक्रीचा बाजार समजत असतात. पैश्याच्या हव्यासातून हुंडा घेतला जातो हे खरे, परंतु ही हुंडयाची लालसा माणसाचे कसे नुकसान करते याचे चित्रण गणपतराव सोकाजी त्रिलोकेकर यांच्या "हुंडा" ( १९०४ ) नाटकातून आढळते. एका दृष्टीने हे नाटक, अनिष्ट चालीपासून होणा-या अनर्थाचे चित्रच समाजापुढे ठेवते. दुस-याचा तळतळाट घेवून हुंडा घेतल्याने खंडेरावाच्या वाटयाला येणारा पश्चाताप मोठा परिणामकारक आहे.

भा.वि.वरेरकर यांनी "हाच मुलाचा बाप" ( १९०४ ) हे नाटक लिहून हुंडा व वधूपरीक्षा या जाचक प्रथावर प्रहार केले आहेत. यातील रावसाहेब हे वरपिता आहेत. "हुंडा प्रहसन" मधील रावसाहेबांची दुसरी आवृत्तीच आहे. विनायक सुभेदार यांनी "हुंडयाचा हंडा" ( १९२८ ) या नाटकात, हुंडयामुळे एका कुटुंबाचा कसा नाश होतो याचे चित्रण केले आहे. तर हाच हुंडा स्त्रीचे स्थैर्य व सुरक्षितता कशी धोक्यात आणतो, स्त्रीला संसारापासून कसा तोडतो याचे चित्रण गणेश कृष्णशास्त्री फाटक यांच्या "पंताची सून" ( १९२८ ) या नाटकातून येते. नव-याचे प्रेम असूनही सास-याच्या हुंडा लोभापायी इंदूच्या जीवनाची झालेली फरपट या नाटकात चित्रीत केली आहे.

• वधूपरीक्षा व हुंडा या स्त्री समस्या टाळण्यासाठी बहुतेक नाटककारांनी <u>प्रीतिविवाहाचा पुरस्कार</u> केला आहे. पाश्चात्य देशात प्रीतिविवाहाला जसे अनुकुल वातावरण आहे तसे आपल्याकडे नाही. भारतीय संस्कृतीचा संस्कार घेवून मुले-मुली वाढतात. लग्न ठरविण्याचा अधिकार पालकांकडे असतो. खरंतरं प्रौढ झाल्यानंतर आपल्या जीवनाचा जोडीदार निवडण्याची पात्रता त्यांच्या ठायी असते. स्वतः पुढाकार घेवून प्रेमविवाह ठरविला तरी, त्याला पालकांची संमती घ्यावी, अशी मुलामुलींची धारणा असते. मुलांनी परस्पर ठरविलेला विवाह कुटुंबाला रुचत नाही. कुटुंबातल्या कर्त्या माणसाला ते आपल्या अधिकारावरचे अतिक्रमण वाटते. त्यामुळे दोन मनांच्या मिलनातून साकार होणारा हा प्रीतिविवाह प्रकार आजही म्हणावा इतका समाजमान्य नाही. पालकांनी पुढाकार घेवून ठरविलेला आयोजित विवाह समाजात रुढ आहे. प्रीतिविवाह रुढ होण्यासाठी पोषक वातावरण निर्माण झाले पाहिजे. घरातील आईवडिलांचा पाठिंबा नसेल तर प्रीतिविवाह

मोडला जातो· घरातल्या वडिलधा-या मंडळीच्या विरोधाला न जुमानता फार थोडे विवाह यशस्वी होताना दिसतात· असा विवाह करणा-यांना घरातल्यांचा रोष पत्कारावा लागतो· शिवाय अनेक सामाजिक समस्यांना तोंड द्यावे लागते· एकाच जातीतील प्रीतिविवाह असेल तर पालकांची विवाहास मान्यता मिळण्याची शक्यता असते· कुटुंब प्रगत विचारांचे असेलतर आंतरजातीय विवाहासही मान्यता मिळते· प्रीतिविवाह हे कुंटुंबाच्या विचारसरणीवर अवलंबून असतात·

हुंडा व वधूपरीक्षा टाळण्यासाठी प्रीतिविवाहाचा पुरस्कार करणा-या मराठी नाटकांनी, प्रीतिविवाहातील समस्याही मांडल्या आहेत· प्रीतिविवाह हा उथळपणे, भावनेच्या आवेशात करण्यापेक्षा अतिशय काळजीपूर्वक, डोळसपणे, दूरदृष्टीने, एकमेकांच्या स्वभावाची पारख करून, सुज्ञ मंडळींचा सल्ला घेवून करावा, अशीच या नाटककारांची भूमिका आहे·

"हाच मुलाचा बाप" या नाटकात यमुना व मंजिरी यांचे विवाह हुंडयाच्या समस्येमुळे लवकर जमत नाहीत· यमुनाला तर वधूपरीक्षेचा तिटकारा असतो· कारण तिला ब्याण्णव वेळा नकार मिळालेला असतो· यातील मंजिरीला विवाहाची रूढ पध्दत मान्य नाही· वधूपरीक्षा ही स्त्री ला कशी अपमानास्पद वाटते याची प्रचिती देण्यासाठी मंजिरी वरपरीक्षा घेते· मंजिरीच्या धीटपणातून लेखकाने प्रचलित समाजप्रवृत्तीवर बोट ठेवले आहे· गुलाब व मंजिरी, यमुना व वसंत यांचे प्रीतिविवाह दाखवून रूढविवाह पध्दतीतील दोष स्पष्ट केले आहेत·

वा·कृ·भावे यांचे "प्रीतिविवाह" (१९३५) हे नाटकही रूढ विवाह पध्दतीतील दोषांची जाणीव देते· परंतु ते प्रीतिविवाहाचा पुरस्कार करीत नाही तर ते दोषनिर्मूलन सुचविते·

आनंदीबाई किर्लोस्कर यांनी "नव्या वाटा" या नाटकाव्दारे परिचय मंडळाची कल्पना मांडून विविध मनोरंजक कार्यक्रमाव्दारे जीवनसाथी निवडण्याचा विचार समाजापुढे ठेवला आहे·

एकंदर रूढ विवाह पध्दतीमुळे मुलींची होणारी कुचंबना मराठी नाटकांनी मांडली त्यावर प्रीतिविवाहाचा पर्याय सांगितला· परंतु पूर्ण विचारांनी असा प्रीतिविवाह ठरविला गेला नाही व पूर्ण पारख केल्याशिवाय असा विवाह झाला तर, स्त्रीच्या वाटयाला कशी दारूण अवस्था येते याचे चित्रण सौ·शांता निसळ यांच्या "सौभाग्यकांक्षिणी" नाटकात येते·

भूलथापा देणा-या विद्याधरामुळे अहिल्येच्या जीवनाची वाताहत होते· अशी वेळ येवू नये यासाठी प्रीतिविवाह डोळसपणे केला पाहिजे असा संदेश हे नाटक देते· पुरेसा विचार न करता, अपु-या माहितीवर झालेला प्रीतिविवाह कसा मनस्ताप देणारा ठरतो याचे चित्रण विमल काळे यांच्या "मृगजळ" या नाटकात आहे· नेमका हाच विषय आचार्य अत्रे यांच्या "तो मी नव्हेच" या लोकप्रियतेचा उच्चांक गाठणा-या नाटकात कौशल्याने मांडलेला आहे·

विवाह मग तो आयोजित विवाह असो वा प्रीतिविवाह असो· तो पूर्ण विचारांतीच ठरविला पाहिजे· पूर्ण विचारांचा व डोळसपणाचा अभाव असेल तर विवाह अयशस्वी होतात व पूर्ण विचारांती होणा-या प्रीतिविवाहात फसगत होत नाही· या दोन्ही प्रकारचे चित्रण सौ·मालती दांडेकरांच्या "पर्वकाळ ये नवा" ( १९७० ) या नाटकात येते· डॉ·इरावती व अरूणा राजकन्या या दोघींनी विचारपूर्वक प्रीतिविवाह केले आहेत· परंतु याच नाटकातील करूणीची मात्र, पुरेसा परिचय व पारख न झालेल्या भैय्यासाहेबामुळे फसगत झाली आहे· अशा प्रकारची समस्या, सौ·सुहासिनी अभ्यंकर यांच्या "इथे जन्मली व्यथा" या नाटकात चित्रीत केली आहे· परंतु या नाटकातील साधना खंबीरवृत्तीची आहे· प्रकाश बेजबाबदार निघतो· त्यामुळे वाटयाला येणा-या दुःखाची जबाबदारी स्वतः साधना स्वीकारते, व धैर्याने उभी राहते· जयवंत दळवी यांच्या "पर्याय" नाटकातही अखेरीस येणारी माईची सून अशीच ठामपणे उभी राहते व लढा देते· तिला सास-याची व समाजाची साथ मिळते· सामाजिक बहिष्कार हा पर्याय प्रत्यक्ष व्यवहारात अवघड असला तरी हुंडा व त्यामुळे होणारा स्त्री छळ, या समस्या विरूध्द सामाजिक संघटनांनी व विचारवंतानी पुढाकार घेतला तर स्त्रीचे जीवन सुरक्षित व समाधानी होईल हेच या नाटकातून सुचित करावयाचे आहे·

हुंडा व वधूविवाह यांना उपाय म्हणून प्रीतिविवाहाची कल्पना मराठी नाटककारांनी उचलून धरली· त्याचे परिणामही सुचित केले· हुंडा व वधूपरीक्षा यांना प्रतिकार करणे हीच मराठी नाटकांची प्रेरक भूमिका होती· आधुनिक मराठी नाटकाच्या प्रेरणांचा विचार करताना, स्त्री समस्यांचा विचार मराठी नाटकांनी केलेला आहे· रूढ विवाहपध्दतीमुळे स्त्रीला सोसाव्या लागणा-या यातना, होणारा अन्याय मराठी नाटकांनी दाखविला· हुंडयामुळे कित्येक कुटुंब कर्जबाजारी होवून उध्वस्त होतात· कित्येक प्रीतिविवाह, दोन मनामुळे जुळतात परंतु धनाच्या लालसेमुळे तुटतातही· पालकांच्या हुंडा लोभामुळे व मुलाच्या

निष्क्रियवृत्तीमुळे ठरलेले प्रीतिविवाह मोडले जातात. हुंडा देण्याची आर्थिक कुवत नसल्यामुळे कित्येक मुलींवर अविवाहित राहण्याची पाळी येते. वधूपरीक्षेत नकार मिळालेल्या मुलींना मनस्ताप होतो. वधूपरीक्षेत मुलीच्या व्यक्तिगत गुणापेक्षा तिच्या दर्शनी रूपालाच महत्व येते. अंतरंगापेक्षा कातडीच्या रंगाला महत्व दिसते.

प्रीतिविवाहाला अनुकुल असे कौटुंबिक वातावरण नसल्याने, मुलींना वधूपरीक्षेसारख्या अपमानास्पद प्रसंगाला तोंड द्यावे लागते. या सर्व प्रकारामध्ये निरपराध स्त्रीला मानसिक छळ सोसावा लागतो. विवाहपध्दतीतील हुंडा व वधूपरीक्षा ह्या स्त्री समस्या सुटतील तेव्हाच स्त्रीला आनंदी जीवन जगता येईल. हुंडयासारखी समस्या कायद्याने बंद होवू शकत नसल्याचे सिध्द झालेच आहे. त्यासाठी प्रीतिविवाहाचा पुरस्कार झाला पाहिजे. "हुंडा घेणार नाही" अशी पोकळ प्रतिज्ञा करून, कुटुंबापुढे मान तुकविणा-या तरूणांपेक्षा कृतिशील विचाराने आपली प्रतिज्ञा खरी करून दाखविणा-या तरूणांची समाजाला आवश्यकता आहे. यासाठी पालक व मुले यांच्यात सुसंवाद हवा. प्रागतिक विचारांचे वातावरण समाजात निर्माण झाले पाहिजे. तर स्त्रीचा भविष्यकाळ उज्वल होणार आहे. समानतेचा घोष करण्यापेक्षा प्रत्यक्ष आचाराची गरज आहे. त्यातूनच स्त्रीचे स्थान व मान उंचावले जाणार आहे. न्यायमूर्ती विरूपाक्ष आबाजी नाईक म्हणतात, "स्त्री स्वातंत्र्याचा व समतेचा प्रश्न समाधानकारकपणे सुटावयाचा असेल तर स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. प्रथमतः लग्नसंस्थेत अमूलाग्र परिवर्तन घडवून आणले पाहिजे. याकरिता वधूवरांना समान पातळीवर आणले पाहिजे. वरपक्षाने वधूपक्षाकडून हुंडा घ्यायचा ही चाल प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे व हुंडा प्रतिबंधक कायद्याने या पध्दतीला आळा बसलेला नाही. फक्त हुंडा घेण्याच्या स्वरूपात फरक पडलेला आहे. स्त्री आणि पुरूष यांच्या असमानतेला येथूनच सुरूवात होते. विवाहानंतर स्त्रियांना काही ना काही उत्पन्नाच्या प्राप्तीची साधने उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. स्त्रियांनी काही ना काही व्यवसाय करून द्रव्यार्जन केले तरच स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य मिळेल आणि स्त्री व पुरूष यांच्या समान दर्जाचा पाया घातला जाईल." १३

**xxx आपण विवाहपूर्व स्त्री समस्यांचा विचार केला.**
**विवाहानंतर उद्भवणा-या स्त्री समस्यांचाही विचार केला पाहिजे xxx**

===============================================

**घटस्फोटित स्त्रियांच्या समस्या :::**

पती-पत्नी यांच्यात सुसंवाद असेल तर संसार सुरळीत चालतो. परंतु संसारात विसंवाद सुरू झाला की त्याचे पर्यवसन **घटस्फोटात** होते. पहिल्या पत्नीला टाकून

देवून, पुरूषाकडून दुस-या स्त्रीचा पत्नी म्हणून स्वीकार होतो· विवाह हे एक पवित्र बंधन आहे· स्त्री-पुरूष हे पती-पत्नी या नात्याने जन्माचे बांधले जातात· परंतु या बंधनातून पुरूषाला पळवाट होती· पुरूषाला दोन वा अधिक विवाह करण्याची मुभा होती· परंतु स्त्रीला मात्र तशी नव्हती· पुरूष पत्नीला टाकून दुसरा विवाह करण्यास मोकळा होतो· याला आळा बसावा म्हणून "व्दिभार्या प्रतिबंधक" कायदा झाला· पती व्यसनाधीन असेल, परस्त्रीच्या नादी लागला असेल व सुधारण्यापलिकडे गेला असेल तर स्त्रीला जगणेच अवघड होवून जाते· अशावेळी, घटस्फोट स्वीकारण्यावाचून पर्याय नसतो· घटस्फोटाचा कायदा झाल्यामुळे स्त्रीला विवाहबंधनातून मुक्त होण्याची सवलत मिळाली· या कायद्यामुळे स्त्रीची एक समस्या मिटली तरी दुसरी समस्या उभी राहिली ती म्हणजे स्वतंत्रपणे जगणे· कौटुंबिक परिस्थिती, आर्थिक कुवत यामुळे स्त्रीला इच्छा असूनही पतीपासून अलग होता येत नाही· आहे त्या परिस्थितीत तिला राहावे लागते· मुलीने दिल्या घरीच मरायचे, अशी बहुसंख्य कुटुंबाची धारणा असते· शिवाय घटस्फोटामुळे कुटुंबावर विपरीत परिणाम होतील, त्यात माहेरी लग्नाच्या बहिणी असतील तर त्यांच्या भवितव्यावर त्याचा परिणाम होईल अशी भिती स्त्रीला ग्रासत असल्यामुळे तिला तोंड दाबून बुक्क्याचा मार सहन करावा लागतो·

घटस्फोटित स्त्रीकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन समाधानकारक नाही· घटस्फोटित स्त्रीला उदार मनाने, आधार देण्याची समाजाची मानसिक तयारी दिसत नाही· पुनर्विवाहासाठी स्त्रीची तयारी असलीतरी समाजाच्या उदासिन वृत्तीमुळे तिला खितपत पडावे लागते· त्यातून ती शिकलेली असेल, स्वपायावर उभे राहण्याची हिम्मत असेल तर ती स्वतंत्रपणे जगू शकते· अशा स्त्रिया अपवादाने आढळतात· पारंपरिक वृत्तीने जीवन जगणा-या स्त्रियांचे मन, कौटुंबिक परिस्थिती कितीही हाताबाहेर गेलीतरी, घटस्फोटाला राजी होत नाही· घटस्फोटित स्त्रीची वेदना मांडताना न्यायमूर्ती विरूपाक्ष आबाजी नाईक म्हणतात, "घटस्फोटामुळे लग्नविच्छेदनाचे स्वातंत्र्य मिळाले पण पुनर्विवाहाचा प्रश्न अधिक बिकट झाला· घटस्फोटिता या नात्याने त्या दुर्दैवी स्त्रीवर एक प्रकारचा सामाजिक कलंक आलेला असतो· अविवाहित स्त्रीचे लग्न होण्याची जेथे अडचण तेथे घटस्फोटितेचे काय होईल हे विस्ताराने सांगण्याचे कारण नाही· त्यातल्या त्यात त्या स्त्रीला मुले असतील तर पुनर्विवाह जवळजवळ अशक्य आहे·" १३

**"घटस्फोटाचा दावा"** ही सुध्दा स्त्री जीवनातील मोठी समस्या आहे· कारण या प्रसंगी तिची मानहानी केली जाते· घटस्फोट मिळावा यासाठी तोतया प्रियकर म्हणून कोणाला तरी पुढे केले जाते· प्रत्यक्षात जे घडले नाही, ते प्रसंग तिच्यावर लादले जातात· तिच्या मानसिक व सामाजिक अवस्थेचा विचार केला जात नाही· याचा अर्थ काहीवेळा तिच्यावर घटस्फोट लादला जातो· नव-याच्या जाचातून सुटण्यासाठी ती घटस्फोट घेते· परंतु मागे म्हटल्याप्रमाणे, ती स्त्री आर्थिकदृष्टया सबळ नसेल तर मात्र तिची कुचंबना होते· अशा घटस्फोटित मुलीला सांभाळणे, तिच्या आईवडिलांनाही अवघड होवून जाते· त्यातून घरात लग्नाच्या मुली असतील तर प्रश्न अवघड बनतो·

घटस्फोट घेण्यामागे दोष कोणाचा याचा सारासार विचार न होता सारा दोष त्या स्त्रीच्या माथ्यावर मारण्याची समाजप्रवृत्ती दिसते· सा-या कुटुंबालाच त्याचे परिणाम भोगावे लागतात· याचा अर्थ असा नव्हे की, हे परिणाम टाळण्यासाठी तिने आयुष्यभर दुःख, यातना सहन करत राहावे· शक्यतो घटस्फोट टाळण्यासाठी कर्त्या मंडळींनी पुढाकार घेवून दोन मने जोडण्याचा प्रयत्न करावा· प्रतिष्ठेचा प्रश्न न करता, पती-पत्नीमध्ये सलोखा निर्माण करावा आणि त्यातून घटस्फोट अपरिहार्यच झाला तर उभयतांनी स्वच्छ मनाने एकमेकापासून बाजूला व्हावे· या संदर्भात ॲड·शकुंतला परांजपे म्हणतात, "आमची हिंदू स्त्री ही संस्कारशील आहे· तिच्या प्रतिष्ठेच्या, अब्रूच्या व घरंदाजपणाच्या काही विशिष्ट कल्पना आहेत· कुंपण ओलांडून मर्यादा ओलांडण्याची तिची सहसा तयारी नसते· ह्या दृष्टिकोनातून ब-याचशा स्त्रिया मूकपणे सर्व दुःखे सहन करतात व कायद्याच्या तरतुदींचा फायदा घेण्यास पुढे येत नाहीत, हे आमचे कोर्ट दरबारचे अनुभव· विशिष्ट दुर्दैवी परिस्थितीला सापडलेल्या स्त्रीने ह्या तरतुदींचा जरूर फायदा घ्यावा· स्त्रीलाही मन आहे· भावना आहेत· ती केवळ उपभोग्य वस्तू नाही· ज्यावेळेस तिच्या स्वाभिमानाला धक्का पोचतो, तिची अस्मिता डिवचली जाते, त्यावेळेस तिला स्वतःलाही स्वाभिमानाने जीवन जगावेसे वाटते· उभयतातील प्रेम, समजुतदारपणा, थोडी देवाण - घेवाण तडजोड यावर संसारसुख व स्थैर्य अवलंबून आहे· परंतु ज्यावेळेस ह्या वैमनस्याची झळ मुलांनाही लागते· मुले कुढी बनतात· मुलांच्या भवितव्याच्या दृष्टीनेही अशा निष्प्रेम जोडप्यांनी एकमेकापासून दूर होणे चांगले·" १४

घटस्फोटाच्या समस्येवर मराठी नाटकांनी बजावलेली कामगिरी उल्लेखनीय आहे· आपण आता घटस्फोटित स्त्री समस्येचा विचार मांडणा-या नाटकांचा आढावा घेवूया·

घटस्फोटाचा कायदा होण्यापूर्वी, लिहिल्या गेलेल्या मराठी नाटकांनी घटस्फोटाच्या कायद्याची आवश्यकता सांगितली आहे. त्यानंतर १९५५ साली व्दिभार्या प्रतिबंधक व घटस्फोटाचा कायदा झाला. कायद्याने स्त्री-पुरुष समान लेखून घटस्फोटाचा हक्क दोघांना दिला.

घटस्फोटाच्या कायद्यामुळे स्त्रीला अन्यायकारक पतीपासून सुटका मिळाली व तिच्या जीवनाचा मार्ग सुकर झाला. प्रत्यक्षात कायदा होण्यापूर्वी पती-पत्नी "काडीमोड" या नावाने एकमेकापासून फारकत घेत असल्याचे दिसते. परंतु ही बाब कायदेशीर झाली ती १९५५ ला.."घटस्फोट, अर्धांगी, पुढचे पाऊल" या मराठी नाटकांतून, स्त्रियांची होणारी कुचंबना व घटस्फोट कायद्याची आवश्यकता प्रतिपादित केली आहे. अ.ह.गद्रे यांच्या "घटस्फोट" (१९३०) नाटकातील नर्मदाने, आपल्या नव-याच्या कुटील कारस्थानाचा निषेध करून, घटस्फोट घेतल्याचे दाखविले आहे. तर सौ.मालती माधव तेंडुलकरांच्या "अर्धांगी" (१९३३) नाटकात, घटस्फोटाचा कायदा नसल्यामुळे, नव-याकडून अन्याय होवूनही नलिनीला विवाह बंधनातून मुक्त होता येत नाही. तेव्हा तिच्यापुढे धर्मांतराचा पर्याय राहतो. स्त्रियांनी धर्मांतर करू नये असे वाटत असेल तर घटस्फोटाचा कायदा झाला पाहिजे अशी भूमिका या नाटकाने मांडली आहे. वि.ग.धारप यांच्या "पुढचे पाऊल" (१९४९) नाटकातील अरुणा, प्रयत्न करूनही न सुधारणा-या व्यसनी पती विलास पासून दूर होण्याचा व नवीन जीवन जगण्याचा निर्णय घेते. तिचे हे धाडसी पाऊल स्त्री जागृतीचे निदर्शकच आहे.

वरील नाटके घटस्फोटाच्या कायद्याची आवश्यकता प्रतिपादन करणारी आहेत. घटस्फोटाचा कायदा पास झाल्यावर लिहिल्या गेलेल्या मराठी नाटकातील विवाहित स्त्रियांनी घटस्फोट कायद्याचा आधार घेवून, स्वतःची अन्यायकारक विवाह बंधनातून मुक्तता करून घेतल्याचे व पतीला त्याची वाट मोकळी करून दिल्याचे दिसते. या दृष्टीने भीमराव बा. मोगलगिद्दीकर यांच्या "विस्कटलेली घडी" (१९५५) या नाटकातील क्रांती हेमेंद्रपासून घटस्फोट घेते. याच्या उलट, घटस्फोटाचा कायदा उपलब्ध असलातरी स्त्रीचे मन घटस्फोट घ्यायला सहजासहजी राजी होत नाही. याचे चित्रण ना.बा.पराडकरांच्या "परित्यक्ता"(१९५७) या नाटकात आहे. मान-प्रतिष्ठेसाठी समाजसेवेत गुंतलेली व पती-पुत्रापासून दूर जाणारी सौदामिनी घटस्फोट घेत नाही. कमलच्या प्रेमात पडलेला तिचा पती रत्नाकर तिला (सौदामिनीला) घटस्फोटाचा मार्ग सुचवितो. परंतु ती नव-यापासून दूर न होता, परित्यक्त स्त्री सारखे जीवन जगते.

घटस्फोट घेण्याची विविध कारणे आढळतात. पती-पत्नित विसंवाद असेल, बेबनाव झाला असेल, चारित्र्य बरोबर नसेल, पती परस्त्रीच्या नादी लागला असेल, व्यसनी असेल, किंवा पत्नीला मुलबाळ होत नसेल. अशा विविध कारणाने घटस्फोट घेतले व दिले जातात.

**××× मराठी नाटकांनी परित्यक्त्या स्त्रियांच्या समस्येवरही प्रकाश टाकला आहे ×××**

पतीच्या मर्जीवरच कित्येक कुटुंबातील स्त्रीचे स्थान अवलंबून असते. पत्नीला टाकून देण्यासाठी पती नाना प्रकारची कारणे पुढे करतो. नव-याने टाकून दिलेल्या स्त्रीकडे समाजाच्या बघण्याचा दृष्टिकोनही दुषित असतो. नव-याने टाकून दिलेल्या स्त्रीला "परित्यक्ता" म्हटले जाते. स्त्री जीवनाची विटंबना करणारा हा प्रकार, स्त्रीचे भावविश्व उध्वस्त करून टाकतो. तिच्या वाटयाला अपमान, यातना आणि तिरस्कार येतो. नवरा जिवंत असल्यामुळे व घटस्फोटाचा कायदा नसल्यामुळे तिची अधिकच कोंडी झाली होती. कारण तिला इच्छा असूनही पुनर्विवाह करता येत नव्हता. अशा या निराधार स्त्रीच्या व्यथा मराठी स्त्री-नाटककारांनी आपल्या नाटकांतून मांडल्या आहेत. शि.भि.पारकर यांच्या "भ्रमसंभ्रम" (१९१८) नाटकातील लीलाबाई ही परित्यक्ता स्त्री अखेरीस आत्महत्या करते तर मालती बेडेकर यांनी "पारध" नाटकातील "रमा" ही समाजाची कशी शिकार होते, याचे चित्रण केले आहे. कुमुदिनी प्रभावळकर यांनी "स्त्रियांच्या कुबडया" नाटकात असहाय्य व एकाकी स्त्रीच्या व्यथा मांडल्या आहेत. वरील सर्व नाटके परित्यक्त स्त्री ची समस्या मांडून, समाजातील निर्दय प्रवृत्ती नजरेला आणतात. स्त्रीच्या भावनिक, शारीरिक व आर्थिक परिस्थितीचा व त्या अंगाने येणा-या समस्यांचा विचार ही नाटके करतात.

**पती परस्त्रीच्या आकर्षणात** गुरफटला असेल तर पत्नीला आपल्या वैवाहिक जीवनाचा उबग येतो. तिची मानसिक कुचंबना होते. पतीपासून घटस्फोट घेवून स्वतंत्रपणे जगण्याची परिस्थिती नसलेल्या स्त्रियांची फार घुसमट होते. त्यात स्त्रीच्या मनावर पारंपरिक विचारांचा पगडा असल्याने घटस्फोटाचा मार्ग तिला धक्कादायक वाटतो. आपल्या परीने ती सहनशक्तीच्या बळावर, जोरावर पतीला ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न करते. प्रयत्नाला यश आले की परमेश्वराचे आभार मानते. अन्यथा आल्या प्रसंगाला मुकाटयाने तोंड देत राहते. नव-याला कसे आवरावे हा प्रश्न सदोदित तिच्यापुढे आवासून उभा असतो.

परस्त्रीच्या आकर्षणातून निर्माण होणा-या स्त्री समस्यावर, मा·कृ·शिंदे यांचे "गृहलक्ष्मी" ‖ १९३३ ‖, खंडेराव स·त्रिलोकेकर यांचे "मंगलमहिमा" ‖ १९३३ ‖, प्र·के·अत्रे यांचे "लग्नाची बेडी" ‖ १९३६ ‖ सी·म·बापट यांचे "आधुनिक मस्तानी" ‖ १९५६ ‖, मधुसूदन कालेलकर यांचे "दिल्या घरी तू सुखी राहा" ‖ १९६३ ‖, ही नाटके लिहिली गेली आहेत· याशिवायही या समस्येवर नाटके लिहिली गेल्याचे आढळते·

स्त्री परपुरूषाच्या नादी लागलेली पतीला खपत नाही, हे ओळखून गृहलक्ष्मी नाटकातील कुंदा तसे नाटक करते व आपल्या वैवाहिक जीवनातील समस्या सोडविते· "आधुनिक मस्तानी" मधील शैलाही हाच उपाय करते· "लग्नाची बेडी" व "दिल्या घरी तू सुखी राहा" या नाटकातही हेच सूत्र आहे· आपला पती परस्त्रीच्या मोहात पडू नये, म्हणून पत्नीने खेडवळ राहणी सोडून, नव-याचे मन प्रसन्न होईल असे मोहक राहिले पाहिजे असा विचारप्रवाह "मंगलमहिमा" या नाटकात दिसतो· "लग्नाची बेडी" या नाटकात, पुरूषाच्या स्वभाव प्रवृत्तीतील दोष दाखवून, पतीच्या परस्त्रीआकर्षनाला आळा घालण्याचे काम स्त्रीचे असल्याचे सांगितले आहे· परस्त्रीच्या आकर्षणात गुंतलेल्या नव-याला सोशिकता व त्यागाच्या जोरावर, त्या परस्त्रीपासून बाजूला काढणा-या व जिंकणा-या स्त्रिया, वनमाला भवाळकर यांच्या "संसाराचा सारीपाट" ‖ १९५७ ‖, व माया अकोळकरांच्या "नंदादीप तेवत राहा" ‖ १९६३ ‖ या नाटकात दिसतात· घटस्फोटाचा कायदा उपलब्ध असूनही, सामाजिक, भावनिक व आर्थिक परिस्थितीमुळे स्त्रिया तो मार्ग निवडत नाहीत, तर पूर्वसंस्काराच्या बळावर, नैतिक, आत्मिक सामर्थ्यावर पतीच्या परस्त्रीच्या आकर्षणाची समस्या सोडवताना दिसतात·

**××× आपण घटस्फोटित, परित्यक्त स्त्रियांच्या समस्येवर आधारित नाटकांचा आढावा घेतला· आता आपण अपहृत स्त्री समस्यांचा विचार करूया ×××**

---

आपल्या संस्कृतीमध्ये "पावित्र्य" या संकल्पनेला महत्व आहे· त्यात स्त्री-पावित्र्याला अधिक महत्व असलेले दिसते· स्त्रीचे शील हे काचेचे भांडे असते असेही म्हटले जाते· खरेतर या समानतेच्या जगात स्त्री-पुरूषांच्या शीलसंपन्नतेबाबत असा भेदभाव करणे योग्य नाही· परंतु तसा भेदभाव केला जातो ही वस्तुस्थिती आहे· लहानपणापासून मुलीवर तसे संस्कार केले जातात· एखादी स्त्री जेंव्हा परपुरूषाच्या वासनेचा बळी होते तेंव्हा तिचे जीवन कमालीचे गुंतागुंतीचे होवून जाते· जबरदस्त विषयलालसेमुळे ······

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY

स्त्रीचे पावित्र्य भ्रष्ट केले जाते. तेंव्हा त्या स्त्रीभोवती साशंक वातावरण निर्माण होते. स्त्रीच्या रूपसंपन्न व्यक्तिमत्वावर भाळून, एकतर्फी प्रेमाचा खेळ होवून, तिच्या जीवनाचा कोंडमारा होतो. कित्येक स्त्रियांचे अपहरण करून, त्यांच्यावर बलात्कार केला जातो. काहीवेळा परस्पर भांडणाचा वचपा काढण्यासाठी निराधार स्त्रीवर अत्याचार केला जातो. समाजात शरीर पावित्र्याला महत्व दिले गेल्याने पुरूषही मोठया मनाने अशा अपहृत स्त्रीचा स्वीकार करीत नाहीत. एकतर बलात्काराला बळी पडलेली स्त्री अपराधी भावनेने जगत असते. अशा वेळी तिची मानसिक स्थिती समजावून घेवून, तिला स्वच्छमनाने स्वीकारले गेले पाहिजे. बलात्कारित स्त्रीची व्यथा मांडताना लीला पाटील म्हणतात, "बलात्काराला बळी पडलेल्या स्त्रीला पुढील आयुष्यात "नॉर्मल" होण्यास सहा महिन्यापासून सहा वर्षापर्यंतच्या अवधी लागतो असे दिसून आले आहे. कमालीचा उदासपणा, मनात सतत डाचणारी अपराधित्वाची भावना, सुरक्षितेबद्दलचा कमालीचा अट्टहास, कोणाबद्दलही विश्वास न वाटण्याकडे होणारी प्रवृत्ती, लैंगिक संबंधाबद्दल कमी होणारे आकर्षण अशा अनेक प्रकारच्या मानसिक ताण-तणावांतून बलात्कारित स्त्री जात असते, आणि परिणामतः अशा स्त्रियांत घटस्फोट व आत्महत्या यांचे वाढते प्रमाण दिसून येते." [१५]

काहीही दोष नसताना स्त्रीच्या वाटयाला येणारे दुःख समाजाने समजावून घेतले पाहिजे. अशा निरपराध अपहृत स्त्रियांचा विचार समाजाने मानवतावादी दृष्टीने केला पाहिजे. त्यांच्या भाव-भावनांचा सहानुभूतीने विचार करून पुरुषाने तिला सावरून घेवून, आधार दिला पाहिजे. कुटुंबात अशा स्त्रियांचा स्वीकार झालातरच त्यांच्या जीवनाला पुन्हा उभारी येईल.

अपहृत स्त्रियांच्या समस्येवर, मराठी नाटकारांनी मानवतावादी दृष्टिकोन स्वीकारलेला दिसतो.

भारताच्या स्वातंत्र्यानंतर झालेल्या फाळणीत हजारो स्त्रियांचे अपहरण झाले होते. अशा स्त्रियांना माणूसकीचा व आपुलकीचा ओलावा हवा होता. ह. वि. देसाई यांच्या "१९४७" या नाटकातील विश्वंभट, फाळणीच्या वेळी बलात्कार झालेल्या वंदनाला घरात सन्मानाने आश्रय देतो. तर ना.सी. फडके यांच्या "जानकी" नाटकातील राघव आपल्या अपहृत पत्नीचा-जानकीचा उदारमनाने स्वीकार करतो. देहभ्रष्ट झालेल्या अपहृत स्त्रियांच्या स्वीकाराची समस्या निर्माण होण्याचे कारण आपण वर सांगितलेले आहेच. या आपल्या संस्कृतीत स्त्री पावित्र्याची कल्पना देहसापेक्ष आहे. यामुळेच भा.वि.

**वरेरकरांच्या** नाटकातील जगदीश आपल्या आई व बहिणीला घरात आश्रय देत नाही. स्वातंत्र्यानंतर हैद्राबाद संस्थानात रझाकरांची चळवळ झाली, त्यातही स्त्रियांचे अपहरण झाले. त्यांच्यावर अत्याचार झाले. अशा स्त्रियांची समस्या **मो.स. साठे** यांच्या **"भुजंग"** या नाटकाने चित्रीत केली आहे. अपहृत स्त्रियांचा माणूसकीच्या नात्याने स्वीकार करावा हा संदेश देणारी ही नाटके आहेत.

अपहृत स्त्रीबद्दल सामाजिक दृष्टिकोन सुधारला पाहिजे. त्यासाठी सामाजिक आरोग्य सुधारले पाहिजे. यासंदर्भात **लीला पाटील** म्हणतात,"स्त्री वर्गातील वाढती जागृती व त्यांची अधिक बलशाली होत जाणारी संघटित शक्ती यांच्या प्रभावामुळे बलात्कारित स्त्रीबद्दलचा समाजाचा दृष्टिकोन हळूहळू बदलत असलातरी हा बदल हळू आहे. बलात्कारित स्त्री संबंधीचा सदोष दृष्टिकोन अजूनही काही न्यायाधीशांच्या निर्णयात दिसून येतो. आज बलात्कार म्हणजे स्त्रीला अवमानित करण्याचे एक हत्यार बनले आहे. हे हत्यार का उगारले जाते, कोण उगारते, ज्या स्त्रिया या अवमानाला बळी पडतात त्यांची मानसिक आणि शारीरिक स्थिती कोणती होते, अशा स्त्रियांना शारीरिक, मानसिक आणि कायदे विषयक तत्पर मदत देण्यासाठी काय केले आहे आणि आणखी काय करू शकू,साहित्य, चित्रपट, आकाशवाणी, दूरचित्रवाणी, वर्तमानपत्रे आणि मासिके यांसारख्या प्रसार माध्यमातून लैंगिक सुखाबद्दलच्या कोणत्या कल्पना समाजात प्रसृत होत आहेत. अशा सा-याच बाबींचा अभ्यास आपण करावयास हवा." [१६]

स्त्रियांवर होणारे अत्याचार टाळण्यासाठी, समाजात स्त्रियांच्याबाबतीत, सुरक्षित व सुयोग्य वातावरण निर्माण होण्याची आवश्यकता आहे.

स्त्रीचे अपहरण ही पुरातन काळापासून चालत आलेली समस्या आहे. रावणाने सीतेचे केलेले अपहरण व ब-याच अग्निदिव्यानंतर रामाने तिचा केलेला स्वीकार यातून अपहृत स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन दिसतो. अपहृत स्त्रीचा सामंजस्याने व उदार अंतःकरणाने स्वीकार व्हावा, यासाठी मराठी नाटककारांनी निर्माण केलेले वातावरण निश्चितच मानवतावादी व मोलाचे आहे.

मराठी नाटकातून विशेषतः **कौटुंबिक नाटकातून घडणा-या स्त्रियांचे दर्शन हे** पारंपरिक **स्वरूपाचे आहे.** "पती हाच परमेश्वर आणि घर हेच मंदिर" मानून जगणा--या स्त्रिया, मराठी नाटकातून चित्रीत केल्या गेल्या आहेत. या विज्ञान युगात स्त्रीचे जीवनही झपाट्याने बदलत असल्याची व तिचा सामाजिक सहभाग, हा समाजालाही

हितकारक असल्याची जाणीव, काही नाटककारांना मात्र जरूर झाली. परंतु काही नाटककारांनी पारंपरिक स्त्रीचे रूप चित्रीत करण्यावर भर दिला. यामध्ये पु.भा. भावे यांच्या "स्वामिनी," "पडछाया " मधुसूदन कालेलकर यांच्या" अबोल झालीस का? " बाळ कोल्हटकर यांच्या" एखादयाचे नशीब," "वेगळं व्हायचंय मला," या नाटकांची उदाहरणे देता येतील. अजूनही विस्ताराने यावर उदाहरणे देवून चर्चा करता येईल. परंतु आपणास येथे पारंपारिक स्त्री पेक्षा वेगळ्या अशा नव्या विचाराने पुढे सरसावणा-या स्त्रियांच्या व त्यांच्या समस्यांचा विचार करावयाचा आहे. नव्या विचाराने स्त्री पुढे आलीतर, अनेक समस्यावर मात करू शकते. या संदर्भात डॉ. लीला पाटील, "भारतीय स्त्री जीवन" या ग्रंथात म्हणतात,"आज बालविवाह, हुंडा पध्दती, जातीयता, अंधश्रध्दा व लोकभ्रम, व्रतवैकल्ये व बुवाबाजी वगैरेपासून समाजाला वाचवायचे असेल तर प्रामुख्याने महिलांनी नवे विचार, पुरोगामी दृष्टिकोन, सामाजिक बदल स्वीकारायला हवेत. सामाजिक विषमता, जातीयता, नव्या रूढी व परंपरा या विरूध्द मित्रमंडळीस बोलणा-या भाषणे देणा-या पुरूषांना तशी कृती करण्याची इच्छा असल्यास स्त्रियांची साथ मिळतेच असे नाही, कारण घराबाहेर न पडलेल्या या स्त्रियांना बाहेरच्या बदलाची, जगातील नव्हेतर देशातील प्रवाह व प्रवृत्तींची, गतिशील अशा जीवनाची जाणीव नसते. शिवाय स्वतः त्या सामाजिक बदल स्वीकारण्यास उत्सुक नसल्याने कुटुंबाच्या विकासाला, पुरूषांच्या विकासाला व पुरूषांच्या निर्णयामध्ये त्यांचे विचार अडसर ठरतात. म्हणून त्यांचाही उत्पादक कार्यात शिरकाव हा सामाजिक विकास व प्रबोधनाच्या कामास अनुकुल ठरेल." १७

स्त्रियांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होण्यासाठी, त्यांनी आत्मविश्वासाने विविध उद्योग-व्यवसायात सहभागी झाले पाहिजे तर त्यांचा सामाजिक दर्जा सुधारेल. अशी अपेक्षा व्यक्त करून डॉ. लीला पाटील म्हणतात,"स्त्रियांनी केवळ गृहिणी, माता, सून याच भूमिका काया-वाचा- मने बजावत राहण्यापेक्षा उत्पादक घटक, व्यवसायात सहभागीदार, आर्थिक सहकारी बनण्याचा प्रयत्न करायला हवा. आज त्यांचे घरकाम, शिशुसंगोपन, शुश्रूषा यांना महत्व व आर्थिक मूल्य आणि व्यावसायिक प्रतिष्ठा नाही व नजीकच्या काळात येईल अशी शक्यता नाही. म्हणून निदान घराबाहेर त्यांनी आपली बुध्दी, शक्ती, व कुवत देण्याचा विविध उद्योगाद्वारे प्रयत्न करावा. परिणामी हळूहळू घरातील स्त्री व पुरूष दोघांनाही घरकाम, संगोपन समाधानाने व स्वच्छेने करण्याची गरज निर्माण होईल व त्यामुळे कुटुंबात व समाजात सहजीवनाला व समानतेला मान्यता मिळेल." १८

इंग्रजी अंमल आल्यामुळे आपल्याकडे व्यक्तिस्वातंत्र्याची प्रबळ जाणीव झाली· स्त्री शिक्षणाला चालना मिळाली· स्त्रीच्या व्यक्तिमत्व-विकासाचा विचार झाला· स्त्रिया शिकू लागल्या, जागृत झाल्या· स्वतंत्र विचाराने जगू लागल्या· पारंपरिक स्त्री पेक्षा वेगळी अशी नव विचारांची स्त्री समाजात धैर्याने वावरू लागली· अर्थात त्या नवविचारी स्त्रीलाही भेडसावणा-या समस्या आहेत· स्वतःचे स्थान निर्माण करण्यासाठी तिला कुटुंबाशी, समाजाशी संघर्ष करावा लागतो· अशा नव्या जाणीवने व स्वतंत्रवृत्तीने जगू पहाणा-या, जगणा-या स्त्रियांची व त्यांच्या समस्यांची चित्रणे मराठी नाटकातून आली आहेत· कोणताही नवविचार हा त्याकाळच्या परिस्थितीवर अवलंबून असतो· आजची सामाजिक परिस्थिती प्रगत आहे· आज सर्व क्षेत्राात स्त्रीचा वावर आहे· आजच्या स्त्रीला वैचारिक जाण आणि कर्तृत्वाचे भान आहे·

**श्री· वि· गोरे** यांच्या **"बनावट सही"** नाटकातील सुशीला नव्या जाणीवा प्राप्त झालेली स्त्री आहे· पतीच्या आजारपणात ती, पित्याची व पतीची खोटी सही करून पैसे घेते त्यामुळेच तिच्या पतीचे प्राण वाचतात· परंतु पती तिचा शुध्द हेतू समजून घेत नाही· आत्मभान आलेली सुशीला अखेरीस गृहत्याग करते· **मामा वरेरकरांच्या "जागती ज्योत"** मधील कुंदा व्यापारी क्षेत्रात उतरलेली दाखविलेली आहे· तसेच त्यांच्या **"समोरासमोर"** नाटकातील सुलभाही डॉक्टर आहे· **गो·के· भट** यांच्या **"गृहदाह"** नाटकातील शैला ही पैसा व कीर्तीच्या आकांक्षेने सिनेमा क्षेत्रात उतरण्याचा निर्णय घेते· तिचा निर्णय योग्य की अयोग्य हे पाहण्यापेक्षा, ती स्वतंत्रपणे विचार करते ही बाब महत्वाची आहे· **मो· ग· रांगणेकर** यांच्या **"माझे घर"** मधील लक्ष्मी कुटुंबास स्वव्यक्तिमत्वाची जाणीव करून देणारी नवविचारी स्त्री आहे· **प्र· के· अत्रे** यांच्या नाटकातील उल्का नवरेशाहीचा निषेध करते व नाटकात काम करण्याचा निर्णय घेते· तिचे वैचारिक स्वातंत्र्य नवस्त्रीचे दर्शन घडविते· **वसंत** कानेटकरांच्या **"घरात फुलला पारिजात"** या नाटकात चंद्रलेखा ही पारंपरिक व नव अशा मिश्र विचारांनी युक्त असणारी स्त्री आहे· संकटामुळे हताश झालेल्या पतीला नैतिक बळ देण्याचे सामर्थ्य असलेली चंद्रलेखा एक जागृत व विचारी स्त्री आहे· कानेटकरांच्या **"पंखाना ओढ पावलाची"** या नाटकातील साधना महाजन ही समाजसेविका; नवविचारी स्त्रीचे प्रभावी दर्शन घडविणारी व्यक्तिरेखा आहे· सर्वसामान्य स्त्रियांप्रमाणे सुखी संसारात रमण्यापेक्षा ती पतित स्त्रियांचा उध्दार करण्यासाठी काही काळ घराबाहेर पडण्याचा निर्णय घेते· एका स्वतंत्र कर्तबगार, कणखर, करारी स्त्रीचे दर्शन घडविणारे हे नाटक आहे· स्त्रीला स्वतःचे एक व्यक्तिमत्व असते· ते विकसित करण्यासाठी पुरूषाचे सहकार्य मिळणे आवश्यक

आहे· स्त्रीला स्त्री-मुक्ती हवी आहे ती पुरुषाशी संघर्ष करून नव्हे तर पुरुषाशी सहकार्य करून· यासाठी पुरुषाने "मी मालक आहे" ही वृत्ती बदण्याची गरज आहे· पुरुष ही वृत्ती बदलत नाही त्यामुळेच कर्तबगारी गाजवू शकतील अशा स्त्रियांचा कुटुंबात कोंडमारा होतो· प्रसंगी कुटुंबाशी संघर्ष करून तिला स्वतःचे अस्तित्व व कर्तृत्व सिध्द करावे लागते· व तशा त्या सिध्द करतातही·

आजची स्त्री प्रत्येक क्षेत्रात पुरुषाबरोबर समर्थपणे संचार करते आहे· स्वतःची ओळख तिला पटल्यामुळे ती स्वतंत्रपणे व नव्याजाणीवेने उभी राहिलेली दिसते· स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा विकास कोणत्या मार्गाने करावयाचा याचा निर्णय घेण्याइतकी वैचारिक पातळी स्त्रीला लाभली आहे· समाजाचा एक समान घटक म्हणून तिने आपले अस्तित्व निर्माण केले आहे· स्त्रीच्या या अस्तित्वाची नोंद मराठी नाटकाने घेतली आहे·

आपण विविध मराठी नाटकांच्या आधारे महाराष्ट्रातील समाज जीवनाचे स्वरूप व स्त्री विषयक समस्यांचा आढावा घेतला· प्रस्तुत विवेचनात स्त्री विषयक सर्व समस्यांचा आढावा घेतला गेला नाही· यामध्ये देवदासी स्त्रियांच्या समस्या, कुमारी मातांच्या समस्या, शरीर विक्रीचा धंदा करण्या-या वेश्यांच्या समस्या, प्रौढ कुमारिकांच्या समस्या आहेत· आपण समाजामध्ये अधिक व्यापक असणा-या हुंडा, घटस्फोट या समस्यांचा विस्ताराने विचार केला· या बरोबरच परित्यक्त, अपहृत व नवविचारी स्त्रियांच्या जीवनाचा व समस्यांचा विचार केला· आता आपणास या सर्व पार्श्वभूमीवर, तेंडुलकरांच्या सामाजिक नाटकांचा विचार करावयाचा आहे· तेंडुलकरांची बहुतेक सर्वच नाटके सामाजिक असली तरी, स्त्री समस्याविषयक सामाजिक नाटकांचाच आढावा घेण्याचा विचार आहे व त्या अनुषंगाने त्यांच्या नाटकांचे वेगळेपण मांडण्याचा हेतू आहे·

## ××× तेंडुलकरांची सामाजिक नाटके आणि स्त्री समस्या ×××

तेंडुलकरांनी सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक अशा विविध विषयावर नाटके लिहून, कौशल्याने विषय हाताळले आहेत· त्यांच्या लेखनाची व्याप्ती मोठी आहे· मध्यम वर्गीयापासून ते उच्चस्तरीय जीवनापर्यंतचे चित्रण त्यांच्या नाटकांमध्ये आढळते· तसेच सामाजिक दृष्ट्या अगदी खालच्या स्तरातील जीवनाचाही त्यांनी मार्मिक वेध घेतला आहे· तेंडुलकर केवळ वर्तमानकालीन विषयातच रमले नाहीत तर गतकालीन घटना प्रसंग घेवून त्यांनी भूतकाळातील व्यक्तिरेखा जिवंत केल्या. या घटना गतकालीन असल्यातरी नाटकाचे धागे वर्तमानकालीन समस्येला ग्रेवून मिळतात· राजकीय घडामोडी, मनोव्यापार

यावर नाटके लिहून त्यांनी आपल्या नाट्यलेखनाला व्यापकता मिळवून दिली आहे. तेंडुलकरांच्या एकूण नाट्यसृष्टीचा आढावा घेता, एक गोष्ट स्पष्ट जाणवते की, तेंडुलकरांच्या नाटकांना वर्गीय मर्यादा पडलेल्या नाहीत. तसेच त्यांची बहुतेक सर्व नाटके सामाजिक आहेत.

एखादया कुटुंबाच्या माध्यमातून किंवा एखादया समाजसमूहाद्वारे तेंडुलकर मानवी जीवनातील मूलभूत व सनातन झगडा आपल्या नाटकातून चित्रीत करतात. त्यांची नाटके विशिष्ठ तत्कालीन प्रश्नावर उभी राहिली असली तरी, ही नाटके त्या काळापुरती मर्यादित न राहता, त्यांचे संदर्भ आजच्या परिस्थितीतही लागू पडतात. चिरंतन चिंतनशील वाटावी अशी त्यांची नाटके सामाजिक परिस्थितीचे परखड दर्शन घडवितात. यासंदर्भात डॉ. **चंद्रशेखर बर्वे** म्हणतात, "सामाजिक परिस्थितीचे चित्रण तेंडुलकरांनी केलेले असले तरी विशिष्ट, तात्कालिक, प्रचलित प्रश्नापुरतेच ते त्यांनी सीमित ठेवलेले नाही. सामाजिक स्थितीकडून असामाजिक गतीकडे व चिरकालिक आंतरक्रियेकडे जाण्याची तेंडुलकरांची प्रवृत्ती त्यांच्या बहुतेक सर्वच नाटकातून दिसून येते. चिरकालिक आंतरक्रिया, अलिप्तता सहसा न सोडता, रोकठोकपणेच तेंडुलकर शब्दांकित करतात." १९

समाजातील विविध प्रकारच्या प्रवृत्ती, त्यातून निर्माण होणारे प्रश्न तेंडुलकर आपल्या नाटकातून दाखवितात. समाजातील प्रत्येक व्यक्तीचा **"माणूस"** म्हणून विचार झाला पाहिजे अशी त्यांची धारणा दिसते. समाजातील दांभिकता, अमानुषवृत्ती यांची त्यांना चीड आहे. याचे प्रत्यंतर आपणास श्रीमंत, एक हट्टी मुलगी या सारख्या नाटकातून येते. "श्रीमंत" मधील दादासाहेब व "एक हट्टी मुलगी" मधील नात्या ही पात्रे दांभिकवृत्तीची आहेत. **"शांतता! कोर्ट चालू आहे"** या नाटकातही समाजाच्या दांभिकतेचा प्रत्यय येतो. त्यामुळे कु. **बेणारे** यांना येणारा अनुभव मन अस्वस्थ करतो. **"शांतता! कोर्ट चालू आहे"** या नाटकाबरोबरच **गिधाडे, घाशीराम कोतवाल** या नाटकातूनही दंभस्फोट आढळतो.

तेंडुलकरांच्या नाटकांना वर्गीय मर्यादा नाहीत, हे विधान आज आपण निश्चितपणे करू शकतो. परंतु त्यांच्या नाट्यलेखनाच्या प्रारंभीच्या काळात तेंडुलकरांची नाटके ही मध्यमवर्गीय जीवनाचे चित्रण करीत असलेली आढळतात. नंतर मध्यमवर्गीयांच्या मर्यादा त्यांच्या नाटकाला राहिलेल्या नाहीत. समाजाच्या सर्व स्तरातील जीवन दर्शन त्यांनी मार्मिकतेने घडविले. अनेक प्रवृत्तीची माणसे त्यांनी रेखाटली. माणसाची नाना

रूपे त्यांनी टिपली. वरून एक व आतून निराळीच असणारी कावेबाज, पाताळयंत्री प्रतिष्ठित, उग्र, लैंगिक, हिंसक वृत्तीच्या व्यक्ती त्यांनी नाटकातून उभ्या केल्या. एकूण सामाजिक स्थितीत दिसणा-या व्यक्ती, प्रवृत्तींचे दर्शन त्यांनी नाटकातून घडविले. आपणास प्रामुख्याने समाजजीवनातले स्त्रीसमस्यांचा विचार करावयाचा आहे. त्यादृष्टीने तेंडुलकरांच्या स्त्री समस्यांविषयक सामाजिक नाटकांचा आपण आढावा घेवूया.

तेंडुलकरांच्या नाटकातील स्त्री समस्यांचे स्वरूप विविध प्रकारचे आहे. वेगवेगळ्या स्त्री समस्या त्यांनी प्रभावीपणे मांडल्या आहेत. कुमारी मातृत्वाबाबतची समस्या, परित्यक्त स्त्रियांच्या समस्या, रखेली,अपहृत स्त्रियांच्या समस्या, बाजारू विक्री होणा-या स्त्रियांच्या समस्या, नवविचारी स्त्रियांच्या समस्या या शिवाय पारंपरिक स्त्रियांच्या समस्या तेंडुलकरांच्या नाटकातून दिसतात. या सर्व समस्यांचे एक समानसूत्र म्हणजे **"स्त्री कुचंबना"** हे होय.

तेंडुलकरांचे **"श्रीमंत"** हे नाटक निषिध्द मातृत्वाची स्त्री समस्या मांडते. समाजातील श्रीमंतीवृत्तीचे व त्यामुळे आलेल्या अहंकाराचे दर्शनही या नाटकात घडते. माणूसकीच्या नात्याने मथूच्या अपत्याचे पितृत्व स्वीकारणारा श्रीधर, हा दादासाहेबांना, त्यांच्या कुटुंबाला नकोसा होतो. अगदी मथूला देखिल। परंतु अखेरीस मथु, श्रीधरच्या पितृप्रेमाने व माणूसकीच्या साक्षात्काराने भारावून जाते व श्रीधरबरोबर घराबाहेर पडते.

तेंडुलकरांनी या नाटकात गर्भपाताचीही समस्या मांडली आहे. गर्भपाताचा कायदा **१९७१** मध्ये अस्तित्वात आला. एखादया परपुरुषामुळे फसगत होवून गर्भ राहिलेल्या अविवाहित स्त्रीची स्थिती सामाजिकदृष्टया मोठी गंभीर होवून जाते. त्यावेळी गर्भपाताशिवाय तिला पर्याय नसतो. मातृत्वामध्ये स्त्री जीवनाची सार्थकता असते असे मानले जात असलेतरी, अविवाहित स्त्रीचे मातृत्व निषिध्द मानले जाते. वैद्यकीय सल्ल्यानुसार गर्भपाताचा निर्णय घ्यावा लागतो. स्त्रीच्या मानसिक व शारीरिक स्थितीचा विचार करूनच गर्भपाताचा निर्णय घ्यावा लागतो. या संदर्भात ॲड. **शकुंतला परांजपे** म्हणतात, "मातृत्व ही स्त्रीच्या जीवनातील अत्यानंदाची गोष्ट. संसारी स्त्रीला मातृत्व मिळाले म्हणजे जीवनात कृतकृत्य झाले असे वाटते. परंतु काही वेळेला हेच मातृत्व आईच्या जिव्हारी लागण्याची वेळ आणते. अथवा हया मातृत्वाने तिच्या जीवनात आणखी एक जबाबदारीचे ओझे पडण्याची शक्यता निर्माण होते अथवा तिच्या दृष्टीने शारीरिक व मानसिकदृष्टया हे मातृत्व हानिकारक असू शकते."[२०]

नेमकी हीच समस्या मथूच्या बाबतीत निर्माण होते. गर्भपाताचा उपाय मथूच्या नाजूक तब्बेतीमुळे अशक्य व धोकेदायक असतो. मथूच्या अपत्याला कायदेशीर बाप मिळवून देणे हाच उपाय असतो. त्यातूनच मथूची अब्रू वाचविणे व कुटुंबाची प्रतिष्ठा जपणे शक्य असते. ही समस्या सोडविण्यासाठी तेंडुलकरांनी **"श्रीधर"** नावाचे पात्र रेखाटून विशाल मानवतावादी दृष्टीचे प्रत्यंतर घडविले आहे.

अशीच निषिध्द मातृत्वाची समस्या तेंडुलकरांनी **"शांतता! कोर्ट चालू आहे"** या नाटकात मांडली आहे. या नाटकातील स्त्री समस्येचा सविस्तर विचार पुढील तिस-या प्रकरणात करावयाचा आहेच. परंतु एक गोष्ट येथे नमूद केली पाहिजे की, अतिशय वेगळ्यापध्दतीने त्यांनी स्त्री समस्या मांडली आहे. एक अभिनव कोर्ट उभे करून, एका स्त्रीवर अन्याय झालेला दाखविला आहे. तेंडुलकरांच्या या नाटकाचे सर्व भारतीय भाषात अनुवाद झाले आहेत. एक निरपराध स्त्री समाजसमूहापुढे कशी दुबळी होते. याचे चित्रण या नाटकात येते. **कु.बेणारे** नावाच्या अल्लड, खेळकरवृत्तीच्या शिक्षिकेचा गंमतीच्या खेळात बळी दिला जातो. नाटक सुरु होण्यापूर्वी, शिल्लक राहिलेला वेळ घालविण्यासाठी कोर्ट उभे करून, त्यात कु. बेणारे यांना आरोपी केले जाते. त्यांच्यावर भ्रूणहत्येचा आरोप ठेवून, तो सिध्द करण्यासाठी त्यांच्या खाजगी आयुष्याची चिरफाड केली जाते. हे नाटक म्हणजे समाजातील प्रवृत्तीचे व न्यायदानाचे एक प्रतीक आहे. या नाटकाचे जर्मन भाषेत रूपांतर झाले व बी.बी.सी वरून सादर होण्याचा मानही या नाटकाला लाभला. अशी माहिती देवून, डॉ. सौ. कल्पना परांजपे म्हणतात, "एक आघाडीचा नाटककार या तेंडुलकरांच्या कीर्तीचा कळस या नाटकाने गाठला. रचना व व्यक्तिचित्रण या दोन्ही अंगानी हे नाटक अतिशय सरस आहे. या नाटकात कुमारी मातृत्वाची समस्या **कु.बेणारे** हिच्या रूपाने व्यक्त झाली आहे." **२१**

तेंडुलकरांच्या नाट्यलेखनाचा एक महत्वाचा टप्पा म्हणून ही **"शांतता! कोर्ट चालू आहे"** या नाटकाची नोंद केली जाते.

तेंडुलकरांच्या **"सखाराम बाईंडर"** या नाटकाने मोठी खळबळ उडवून दिली. मराठी रंगभूमीवरील पावित्र्य विटंबनाचा प्रकार म्हणून नाटक व नाटककारावर टीकेची झोड उठवली. लक्ष्मी ही परत्यक्ता व चंपा ह्या गृहत्यागिनी स्त्रियांची चित्रणे या नाटकात आहेत. प्रेक्षकांसमोर, चंपाचा कपडे बदलण्याचा प्रसंग वादाचा ठरला. यावर स्पष्टीकरण देताना एका मुलाखतीत तेंडुलकर म्हणतात, "चंपाच्या वर्गातील बायकांना

पांढरपेशा वर्गातील बायकासारखी प्रायव्हसी मिळत नाही. तुमच्या समोर कपडे बदलतानाच त्या त्यांची प्रायव्हसी सांभाळतात. अंग दिसू देत नाहीत. "पण चंपा स्टेजवर लुगडं सोडते" असा प्रचार सुरु झाला." [२२]

सखाराम बाईंडर "या नाटकामध्ये सखारामच्या जीवनात सहा बायका येतात-जातात. नंतर लक्ष्मी व चंपा येतात. यात चंपा वगळता सा-यांनी नव-याला टाकलेले होते म्हणजे त्या निराधार होत्या. सखाराम त्यांना आधारदेतो. लग्न हे सामाजिक बंधन सखारामला मान्य नाही. परंतु त्याच्या जवळ राहण्या-या स्त्रीने **"लग्नाच्या बायको प्रमाणे"** राहावं, अशी त्याची अपेक्षा असते. नवीन येणा-या स्त्रीशी, आपल्या किमान गरजा भगविण्याचा करार तो करतो. त्याला माया, प्रेम नको तर निष्ठा हवी असते. तो मात्र मनमानेल तसा वागतो, पण रखेलीने तसे वागणे त्यास पटत नाही. चंपाची निष्ठा ढळल्यानंतर सखाराम तिचा खून करतो. सखाराम जवळ असणा-या रखेलीबाबत निष्ठेची अपेक्षा करतो, पण स्वतः मात्र तो निष्ठेच्या बाबतीत बांधून घेत नाही. तेंडुलकरांनी, सखारामच्या रूपाने स्त्रीवर मालकी गाजविणा-या पुरूषाचे चित्रण केले आहे. एक समग्र माणूस उभा करावा, ही त्यांची भूमिका दिसते. "स्त्री हे एक उपभोगाचे, वासनातृप्तीचे साधन आहे." या दृष्टीने सखाराम ठेवलेल्या स्त्रीकडे पाहतो.

या नाटकातील लक्ष्मी ही पारंपरिक व धार्मिक वृत्तीची स्त्री आहे. अपमानाचे शब्दवार सहन करूनही ती सखाराम बरोबर रहाते. एकदा ती घराबाहेर जाते व पुन्हा येते व राहते. इतर स्त्रियांप्रमाणे जा म्हटले तरी जात नाही.

सखारामचा एक विशेष गुण तेंडुलकरांनी येथे दाखविला आहे. तो म्हणजे, सखाराम स्त्री सोडताना साडी-चोळी देतो व तिच्या नातेवाईकांकडे सोडतो. एखादी मरणाची आजारी असलीतर इस्पितळात नेतो. नंतर तिचे क्रियाकर्मही करतो. तेंडुलकरांच्या मते, "तो कुणी उदारमतवादी नाही. तो एक सामान्य माणूस आहे. त्याची समजही सामान्य आहे. तो व्हायोलंट आहे. पण तो स्त्रीला फसवत नाही हे मान्य केले पाहिजे. ज्या पध्दतीने काही नवरे बायकांना रस्त्यावर सोडतात तसे त्यानं कुणा स्त्रीला सोडलं नाही ह्याचाही विचार व्हायला हवा." [२३]

येथे तेंडुलकरांचा, सखारामचे समर्थन कराण्याचा प्रयत्न नाही; तर निराधार स्त्रीला आधार देणा-या सखारामच्या प्रवृत्तीचे वैशिष्ट सांगण्याचा हेतू दिसतो. तेंडुलकरांनी

सखारामच्या वर्गातील माणसाच्या जगण्यातले ताण-तणाव, बारकावे टिपले आहेत व त्या अनुषंगाने त्या समाजातील स्त्री समस्येचे चित्रीकरण केले आहे.

**"बेबी"** या नाटकात तेंडुलकरांनी **"बेबी"** या असहाय्य तरूणीची कथा चित्रीत केली आहे. बेबी ही सिनेमात एक्स्ट्रा म्हणून काम करणारी व शिवापाची रखेली म्हणून राहणारी तरूणी आहे. मानसिक प्रेमापासून ती वंचित आहे. शिवापा तिच्यावर बळजबरी करून केवळ शरीरसंबंध ठेवतो. बेबी त्याच्यापासून मुक्त होवू पहाते. एका असहाय्य तरूणीची कथा तेंडुलकरांनी उभी करून, रखेली म्हणून ठेवलेल्या स्त्री समस्येचे करूण व भावोत्कट चित्रण केले आहे.

**xxx तेंडुलकरांच्या कौटुंबिक नाटकातील स्त्री समस्यांचा आढावा घेवू या. xxx**

**"माणूस नावाचे बेट"** मधील मालू सुखी जीवनाचे स्वप्न रंगविते पण तिची करूणास्पद फसगत होते. **"मधल्या भिंती"** नाटकातील सदाची बायको-मंदा घर सोडून निघते. सदाने आईच्या इच्छेविरूध्द मंदाशी लग्न केलेले असते. तिला (मंदाला) कुटुंबाच्या तिरस्काराला तोंड दयावे लागते. **"मी जिंकलो! मी हरलो!"** या नाटकातील झगडा अनू आणि तिचा पती माधव यांच्यातील आहेत. या पेक्षा तो दोन "मी पणा तील" झगडा आहे. वास्तवाची, व्यवहाराची पुरेपुर जाणीव असलेली विचारी स्त्री येथे अनुच्या रूपाने तेंडुलकरांनी उभी केली आहे. **"एक हट्टी मुलगी"** या नाटकातील मंगला ही प्रांजळ, सरळमार्गी, व स्वविचाराने वागणारी स्त्री आहे. याउलट तिचे सासरे-तात्या हे दांभिकवृत्तीचे गृहस्थ आहेत. मंगलाने सुरू केलेले बदल तात्यांना रूचत नाहीत. आणि मंगलाशी त्यांचा संघर्ष सुरू होतो. ढोंगी माणसाच्या वर्तनामुळे एका सात्विक वृत्तीच्या स्त्रीचा कुटुंबात कसा मानसिक छळ होतो, याचे चित्रण तेंडुलकर करतात.

**"घरटे आमुचे छान"** या नाटकात सुनेत्रावर, तिच्या पतीची मैत्रीण विमला हुकमत गाजवते. घराची मालकी आपणाकडे असावी अशी स्त्रीची असणारी अपेक्षा, मालकीणपदाला धक्का पोहचल्याने होणारी उपेक्षा, यांचे चित्रण तेंडुलकर या नाटकात करतात. **"अशी पाखरे येती"** या नाटकातही मुक्तता प्रिय जीवन जगू इच्छिणा-या व इतरांनाही बध्द न करण्याची इच्छा बाळगणा-या कुटुंबाचे चित्रण आहे.

तेंडुलकरांनी **"गिधाडे"** या नाटकात पारंपरिक, सात्विक स्त्रीची होणारी विटंबना चित्रीत केली आहे. कुटुंबातील मनोविकृत व गिधाडाच्या प्रवृत्तीच्या माणसामुळे "रमा"

वर अत्याचार होतात. ही रमा सरळमार्गी, सोशिक, परावलंबी, अगतिक आहे. प्रत्यक्ष तिचा नवरा रमाकांत, त्याचा भाऊ, बहीण, त्यांचे वडील हे तिला पाशवीपणे वागवतात. मनोविकृत कुटुंबामध्ये एका सालस, सात्विक स्त्रीचा कसा छळ होतो व बळी पडतो याचे हृदय द्रावक चित्रण या नाटकात येते.

हुंडा व वधूपरीक्षा यांना प्रीतीविवाह हा पर्याय मराठी नाटककारांनी मांडला व त्याचे दुहेरी परिणाम सांगितले. आंतरजातीय प्रीतीविवाहातून निर्माण होणारी स्त्री समस्या, तेंडुलकरांनी "कन्यादान" या नाटकातून प्रभावीपणे चित्रीत केली आहे. मुलगी ज्या कौटुंबिक वातावरणात वाढते, ते संस्कार तिच्यावर होत जातात. "कन्यादान" या नाटकातील ज्योती समाजवादी कुटुंबात वाढलेली आहे. ती दलित कवी अरूण बरोबर लग्न करते. अरूणच्या संस्कृतीशी, प्रवृत्तीशी समरस होणे तिला सहज शक्य होत नाही. त्याचे बोलणे-वागणे यामुळे वैतागुन ती वारंवार माहेरी येते. तिच्या मनाची होणारी भावनिक ओढाताण, कुटुंबास तिच्या भवितव्याची वाटणारी चिंता यांचे मार्मिक चित्रण तेंडुलकर करतात. "विचित्र वास्तवाला सामोरा जाताना, त्याचा स्वीकार करताना, माणूस दुभंगतो. आणि तरी तो एकसंघच असतो. याचे विदारक दर्शन हे नाटक घडवून जाते." २४ असे डॉ. चंद्रशेखर बर्वे या नाटकावर भाष्य करतात.

आपण कौटुंबिक जीवनात निर्माण होणा-या समस्यांचा आढावा घेतला. आता बाजारू विक्री होणा-या स्त्रियांच्या समस्यांचा विचार करूया. भारतामध्ये आज विसाव्या शतकातही स्त्रीला गुलाम म्हणून विकले जाणे ही बाब लांच्छनास्पद व माणूसकीहिन आहे. तेंडुलकरांच्या "कमला" या नाटकात, अशा बाजारुविक्री होणा-या स्त्रीचे चित्रण येते. स्त्रीला गुलाम म्हणून वापरणा-या समाजप्रवृत्तीवर तेंडुलकर प्रहार करतात. स्त्रीच्या स्वतंत्र अस्तित्वाचा मुलभूत विचार करणारे हे नाटक आहे. पत्रकार जयसिंगने, बाजारातून विकत आणलेली कमलाच केवळ गुलाम नाही तर, आपणसुध्दा गुलामच आहेत ही जाणीव जयसिंगची पत्नी सरिताला होते.

"मित्राची गोष्ट" या नाटकात सुमित्रा नावाच्या एका स्वतंत्र विचाराच्या पुरूषी वृत्तीच्या, धाडसी तरूणीचे, कोसळत गेलेले शोचनीय, दयनीय जीवनदर्शन घडविले आहे. एक विचित्र आकर्षणची स्त्री समस्या येथे चित्रीत केली आहे. नमा ही या नाटकातील लाजरी व नाजूक मुलगी आहे. मित्राला तिचे आकर्षण असते. तिच्या विषयी तिला

विचित्र व अनिवार ओढ वाटते. नमा शिवाय जगणे तिला असह्य होतं. हे नाटक एक चमत्कारिक आकर्षणामुळे निर्माण होणा-या स्त्री समस्येवर आधारित आहे. सामाजिक, मानसिक वृत्तीप्रवृत्तींचा वेध तेंडुलकर आपल्या नाटकातून घेतात.

**निष्कर्ष :** स्त्री समस्या विषयक मराठी नाटकांच्या प्रेरणा व प्रवृत्ती यांचा आढावा आपण घेतला. यामध्ये नाटककारांनी हुंडा, विवाह, प्रीतिविवाह याबरोबर परित्यक्त स्त्रियांची, कुटुंबातील पारंपरिक स्त्रियांची, स्वतंत्र विचारांच्यास्त्रियांची, आंतरजातीय प्रीतिविवाहाची, समलिंगी आकर्षण असणा-या स्त्रीची समस्या मांडली. यातील काही समस्या मांडत असताना तेंडुलकरांचे वेगळेपण त्यांच्या नाटकातून निश्चितपणच जाणवते. उदाहरणादाखल, "शांतता! कोर्ट चालू आहे" मधील अभिनव कोर्टाची कल्पना, "गिधाडे" मधील मनोविकृत कुटुंबाची मांडणी, "कमला" मधील शिक्षित संसारी स्त्रीला झालेली गुलामगिरीची जाणीव इ. नाटके निश्चितच त्यांच्या वेगळेपणाची व कौशल्याची साक्ष देतात.

तेंडुलकरांच्या गंभीर व शोधक वृत्तीचा प्रत्यय त्यांच्या नाटकातून येतो. स्त्री जीवनातील नाना प्रकारचे ताणतणाव ते नेमकेपणाने टिपतात. कमीतकमी शब्दातून ते स्त्री मनातले भाव व्यक्त करतात. समाजजीवनातील नाट्य ते वेगवेगळ्या दृष्टीने मांडतात. मग विषय कोणताही असो तेंडुलकर तो कौशल्याने हाताळतात, याबाबत तेंडुलकर स्वतः म्हणतात " जगातला कुठलाही विषय हा नाटकाचा विषय होऊ शकतो. असं मी मानतो.. तो मांडण्याची हातोटी आणि वकुब नाटककाराकडे हवा."२५ तेंडुलकरांकडे ती हातोटी व वकुब आहेच. त्यामुळे त्यांचे विधान त्यांच्या बाबतीतच सार्थ ठरते.

## प्रकरण दुसरे

१ काळदाते सुधा,"भारतातील सामाजिक समस्या,"पिंपळापुरे अॅण्ड कं.,पब्लिशर्स,नागपूर, १९८८, पृ. २,३

२ देशपांडे शारदा,"स्त्री-पुरूष तुलना" ताराबाई शिंदे, एक अभ्यास ,स्त्री,पुणे,जुलै १९९१, पृ. ५२

३ साळुंखे आ.ह.,"हिंदु संस्कृती आणि स्त्री,"स्त्री उवाच७-८ मंजिरी,मुंबई,१९८९ ,पृ. १५०

४ तत्रैव, पृ. १५१

५ बनहट्टी-शहाणे(संपा.),"भारतीय स्त्री,"हिंगणे स्त्री शिक्षण संस्था प्रकाशित,पुणे, १९६७, पृ. ८१

६ तत्रैव, पृ. २६४

७ खांडेकर वि.स."उल्का" चार शब्द,प्रस्तावना,देशमुख आणि कंपनी,पुणे,आ.आठवी, १९८९, पृ. १८

८ तत्रैव पृ. १९

९ पाटील विमल,"मराठी नाटक आणि स्त्रियांचे प्रश्न,"स्मरणिका,७१ वे अ.भा.नाटयसंमेलन, सातारा, १९९०

१० खांडेकर वि.स.,"उल्का" चार शब्द,प्रस्तावना, उ.नि.पृ. १७

११ परांजपे कल्पना,"मराठी सामाजिक नाटक आणि स्त्री समस्या,"श्री गंधर्व-वेद प्रकाशन,पुणे, १९८४पृ. १२७,१२८

१२ बनहट्टी-शहाणे(संपा.),"भारतीय स्त्री," उ.नि.पृ. २४४

१३ तत्रैव पृ. २४२,२४३

१४ परांजपे शकुंतला, "उध्वस्त घरटी,"मनोरमा प्रकाशन,मुंबई,१९८९,पृ. १०८, १०९

१५ पाटील लीला,"ओलांडताना," श्री विद्या प्रकाशन,पुणे,१९८८ ,पृ. ३

१६ तत्रैव, पृ. ४

१७ पाटील लीला,"भारतीय स्त्री जीवन," मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे,१९९०,पृ. ९९

१८ तत्रैव, पृ. १००

१९ बर्वे चंद्रशेखर,"तेंडुलकरांची नाटके,"राजहंस प्रकाशन, पुणे, १९८५, पृ. ८०

२० परांजपे शकुंतला,"उध्वस्त घरटी,"उ.नि.पृ. १०१

२१ परांजपे कल्पना,"मराठी सामाजिक नाटक आणि स्त्री समस्या," उ.नि.पृ. ४१९

२२ पै- तेंडुलकर यांनी विजय तेंडुलकर यांची घेतलेली मुलाखत,"साहित्यातून सत्याकडे," डिंपल प्रकाशन,वसई स्टेशन,जि.ठाणे,१९८८ ,पृ.५०९

२३ तत्रैव, पृ. ५१०

२४ बर्वे चंद्रशेखर,"तेंडुलकरांची नाटके," उ.नि.पृ. ६७

२५ पै-तेंडुलकर यांनी विजय तेंडुलकर यांची घेतलेली मुलाखत,"साहित्यातून सत्याकडे," उ.नि.पृ. ५१७